रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक १२६ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in



॥ देही सौभाग्य आरोग्य
देही मे परमं सुखम
रुप देही जयं देही
यशो देही द्विषोजहि ॥

रायगड, शुक्रवार, दि. ४ ऑक्टोबर २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

आजचा रंग
हिरवा

# फणसाड अभयारण्यात महाराष्ट्रातील पहिले 'हर्प काऊंट'

सुधीर नाझरे
| मुरूड जंजिरा |

**जिल्ह्यातील मुरूड तालुक्यातील फणसाड अभयारण्यात सरपटणाऱ्या प्राण्यांची गणना महाराष्ट्रात प्रथमच पार पडली. उपवनसंरक्षक अक्षय गजभिये, सहाय्यक वनसंरक्षक मनोहर दिवेकर, वनपरिक्षेत्र अधिकारी नारायण राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली फणसाड अभयारण्य व ग्रीन वर्क्स ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने फणसाड अभयारण्यात भुपृष्टावरील सरपटणारे प्राणी व पक्ष्यांची गणना नुकतीच पूर्ण झाली आहे. या सर्वेक्षणासाठी ११ राज्यातील एकूण १४३ जणांची नोंदणी केली असली तरी केवळ ३ राज्यातील ४० जणांची निवड करण्यात आल्याची माहिती फणसाड अभयारण्य विभागाने दिली.**

उल्लेखनीय बाब म्हणजे हा जैवविविधता गणनेचा उपक्रम स्टेट बँक ऑफ इंडिया व ग्रीन वर्क्स ट्रस्ट यांच्या संयुक्त पुढाराकाने हाती घेतल्यामुळे फणसाड अभयारण्यातील दुर्मिळ जैव विविधतेचा सूक्ष्म आणि स्थुल अभ्यास करून निश्चितपणे काही निरीक्षण नोंदविणे शक्य होणार असल्याचा विश्वास ग्रीन वर्क्स ट्रस्ट च्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

फणसाड अभयारण्य समुद्र खाडीलगत मुरुडसह रोहा व अलिबाग या तीन तालुक्यात सुमारे ५२ चौ.कि.मी.मध्ये विस्तारले असुन सांबर, भेकर, रानडुक्कर, सायाळ, पिसोरी, शेकरु, बिबटे आदी पान २ वर

सरपटणारे प्राणी व उभयचरांचे सर्वेक्षण

- १०४ प्रजातींचे पक्षी
- १० सस्तन प्राणी
- ३ मॉनिटर सरडे
- ४५ नागीण
- १६ साप




ग्रीन वर्क ट्रस्टचे विश्वस्त यांच्याशी संपर्क केला असता ते म्हणाले की, भूपृष्ठावरील प्राण्यांची मोजदाद करण्यासाठी तज्ज्ञ अभ्यासकांना वाव आहे. स्टेट बँकेने अर्थसहाय्य दिल्याने खऱ्या अर्थाने ही गणना शास्त्रोक्त पद्धतीने होऊ शकेल. ही हर्प काऊंटिंग सलग ५ वर्षे करायला हवी. यापूर्वी फणसाड अभयारण्यातील गणना नियोजनबध्द रित्या झाली नसल्याची माहिती त्यांनी दिली.

आजचा अग्रलेख
**तंबूमध्ये घबराट**

वे|ध|क

## व्यावसायिकाची आत्महत्या

**मुंबई :** मुंबईत अटल सेतूवरुन आणखी एक आत्म हत्या करण्यात आली आहे. माटुंग्यातील व्यावसायिकाने अटल सेतूवरुन समुद्रात उडी मारुन जीवन संपवलं असं वृत्त समोर आले आहे. उपव्यवस्थापकाचा मृतदेह नवी मुंबईतील समुद्रकिनारी वाहून गेलेला आढळून आला, अशी माहिती पोलिसांनी दिली.फिलीप शाह या व्यावसायिकाने अटल सेतूवरून उडी मारून आपले जीवन संपवले. मध्य मुंबईतील माटुंगा येथील रहिवासी असलेल्या शाह आपल्या सेडान कारमधून अटल सेतूवर पोहोचले होते. त्यांनी कार पार्क केली आणि समुद्रात उडी मारली, असं वृत्त पीटीआयने एका पोलीस अधिकाऱ्याच्या हवाल्याने दिले.

## शिक्षकांचे अर्धनग्न आंदोलन

**पाली/गोमाशी :** शिक्षक समन्वय संघाच्या वतीने आझाद मैदान मुंबई येथे शिक्षकांच्या प्रमुख मागण्यासाठी हुंकार आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून गेले ४९ दिवस शिक्षक आझाद मैदानात हुंकार आंदोलन करत होते. शासन कॅबिनेटच्या बैठकीला अनुदानाच्या टप्प्याचा विषय घेतला जाईल अशी उडवा उडवीची उत्तरे देत आहे. मात्र गुरुवारी या समनव्य संघाच्या हुंकार आंदोलनाने उग्ररूप धारण केले. आंदोलनकर्त्यांनी भरदुपारी अर्धनग्न आंदोलन करून शासनाच्या विरोधात बोंबा मारून जाहीर निषेध केला. यावेळी महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने अंशतः अनुदानित शिक्षक उपस्थित होते. जो पर्यंत होणाऱ्या कॅबिनेटमध्ये शिक्षकांच्या टप्पा वाढीचा विषय येत नाही; तोपर्यंत आझाद मैदान सोडणार नाही, असा इशारा शिक्षक समनव्याच्या वतीने शासनाला देण्यात आला.

### महाराष्ट्रात निवडणुकीची लगबग

# ऑक्टोबरमध्ये आचारसंहिता ?

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |

महाराष्ट्राच्या महानिवडणुकीचे पडघम वाजायला सुरुवात झाली आहे. निवडणूक आयोगाने या महा निवडणुकीसाठी तयारी सुरू आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक कधी होणार याची मोठी उत्सुकता आहे. राजकीय पक्षांप्रमाणेच मतदारांच्याही मनात निवडणुकीच्या तारखांबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात निवडणुकीची घोषणा १३ ऑक्टोबरनंतर होण्याची शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, ८ ऑक्टोबरला हरियाणा व जम्मू काश्मीर निवडणुकांचे निकाल लागण्याची शक्यता आहे. तर १० ऑक्टोबरला हरियाणा- जम्मू काश्मीर निवडणूक कार्यक्रम संपणार आहे. नियमानुसार एक निवडणूक कार्यक्रम संपण्यापूर्वी दुसऱ्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा करता येत नाही. दरम्यानच्या काळात निवडणूक आयोगाला तयारी करावी लागेल. १३ ऑक्टोबरला रविवार आहे. १४ तारखेनंतर सुरु होणाऱ्या ऑक्टोबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात आचारसंहितेची घोषणा होऊ शकते आहे.

महाराष्ट्रात नियमानुसार नवी विधानसभा २६ नोव्हेंबर २०२४रोजी अस्तित्वात येणार आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर साधारण ४५ दिवसांनी नवीन विधानसभेची स्थापना होणे अपेक्षित असते. त्यामुळे निवडणूक आयोगाने नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात विधानसभा निवडणूक घ्यायचे ठरवले तर त्यासाठी ऑक्टोबरच्या दुसऱ्या पंधरवड्यात आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. तेव्हापासून राज्यात लगेच आदर्श आचारसंहिता लागू होईल. त्यानंतर ४५ दिवसांचा कालावधी गृहित धरला तरी २६ नोव्हेंबरपूर्वी नव्या विधानसभेची स्थापना होणे शक्य आहे.




## मंत्रालयात हालचाली गतीमान

**लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मविआ याच कामगिरीची पुनरावृत्ती करणार का, महायुती या धक्क्यातून सावरत पुन्हा कमबॅक करणार, याची जोरदार चर्चा सध्या सुरु आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सरकारी पातळीवरही कारभार वेगाने सुरू आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी नव्या प्रस्ताव आणि फाईल्सच्या मंजुरीचा वेग कैकपटीने वाढला आहे. मंत्रीमंडळ बैठकीत तर शासन निर्णय काढण्याचा धडाका सुरू आहे. दिवसाला शेकडो शासन निर्णय जारी होताना पाहायला मिळत आहे. त्यासाठी आमदारांपासून मंत्र्याची चांगलीच धावाधाव सुरु झालीय. आचारसंहितेच्या आधीच टेंडर काढण्यासाठी सर्वांनी ताकद पणाला लावली आहे. विशेष म्हणजे लोकप्रतिनिधींना निधी मिळणारे शासन निर्णय सर्वाधिक पाहायला मिळत आहे.**

# माजी सरपंचाकडून लाखोंचा अपहार

**गटविकास अधिकारी करणार गुन्हा दाखल**

| अलिबाग | प्रतिनिधी |

भाजपचे कार्यकर्ते, कुर्डूस ग्रामपंचायतीचे तत्कालीन सरपंच अनंत पाटील यांनी आपल्या पदाचा वापर करीत २९ लाख १९ हजार ११ रुपयांचा अपहार केल्याचा ठपका गटविकास अधिकारी दाईंगडे यांनी ठेवला आहे. ही रक्कम भरण्यासाठी सात दिवसांचा अल्टीमेटम देण्यात आला आहे. अन्यथा प्रशासन त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या तयारी आहेत.

मागील २०१९ मध्ये झालेल्या निवडणूकीत अनंत सोमा पाटील सरपंच म्हणून निवडून आले. आठ मार्च २०१९ मध्ये त्यांनी सरपंच पदाचा कारभार हाती घेतला. कुर्डूसमधील कमानीला फेब्रुवारी महिन्यात रंग लावला होता. तरीदेखील त्यांनी एप्रिलमध्ये त्याचे काम काढून ४९ हजार रुपयांचे बील मंजूर करून घेतले. या ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या अंगणवाडी परिसरात हायमॅक्स लावण्यापासून अंगणवाडी दुरुस्ती, कोंझरवाडी स्मशानभूमी, पावर घमेल अशा अनेक कामांसाठी पान २ वर

> **आपल्या पदाचा गैरवापर करीत अनंत पाटील यांनी २९ लाख १९ हजार १११ रुपयांचा अपहार केल्याचे अहवालानूसार स्पष्ट झाले आहे. त्यांना सात दिवसांची मुदत दिली आहे. त्यांना दिलेल्या पत्राचे काय उत्तर आले आहे, ते पाहतो. त्यांचे उत्तर आले नाही, तर त्यांच्याविरोधात कारवाई केली जाईल.**
> **- डी. एच. दाईंगडे, गटविकास अधिकारी, अलिबाग**

### गटविकास अधिकाऱ्यांच्या भूमिकेकडे लक्ष

**अनंत पाटील यांना २९ लाख रुपये भरण्याबाबत गटविकास अधिकारी यांनी सात दिवसांची मुदत दिली. ही मुदत संपली आहे. त्यामुळे त्यांच्यावर आता कारवाई होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. गट विकास अधिकारी यांच्या भूमिकेकडे लक्ष लागून राहिले आहे.**

## विद्यार्थ्यांची तयार होणार 'एज्युकेशन हिस्ट्री'

| रायगड | प्रतिनिधी |

राज्यातील पहिले ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची एज्युकेशन हिस्ट्री तयार करण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांचा आधारकार्डनूसार १२ अंकी 'अपार आयडी' तयार करण्यात येणार आहे. केंद्र सरकार यासाठी आग्रही असून पुढील महिन्यात जिल्हा परिषदांच्या शिक्षण विभागातील संगणक विभागाच्या समन्वयकांना मुंबईमध्ये प्रशिक्षण देण्यात येणार आहे. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेने (एमपीएसपी) याबाबतचे पत्र पाठवत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाला प्राथमिक माहिती दिली आहे.

यापुढे पहिली ते बारावीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा १२ अंकी अपार आयडी तयार करण्यात येणार आहे. या आयडीमध्ये संबंधित सर्व शैक्षणिक माहिती संकलित करण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे आधार प्रामाणिकरण झालेले आहे. त्या विद्यार्थ्यांचा यू- डायस प्रणालीमधून माहिती घेऊन 'अपार आयडी' तयार करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने प्रत्येक राज्याला याबाबत सुचना करत विद्यार्थ्यांची एज्युकेशन हिस्ट्री तयार करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्यात पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्यातील ज्या विद्यार्थ्यांची 'आधार'ची माहिती प्रामाणिकरण झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती अपार आयडीमध्ये टाकण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या पहिली ते बारावीपर्यंत शैक्षणिक रेकॉर्ड तयार होणार आहे. यासाठी सरकारच्यावतीने पोर्टल विकसीत केलेले असून ते अपार आयडीचे काम पूर्ण होईपर्यंत कार्यान्वित होणार आहे. दरम्यान, याबाबत केंद्र सरकारकडून महाराष्ट्रात महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण पान २ वर

> **राज्य शिक्षण विभागाकडून अपार आयडी संदर्भातील सूचना रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाला आल्या आहेत. अपार आयडीमुळे विद्यार्थ्यांना नवी ओळख मिळणार आहे. यामुळे जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना याबाबत कळविण्यात आले आहे. लवकरच जिल्ह्यातील सर्व शाळांमधील शिक्षकांमार्फत अपार आयडीचे काम पूर्णत्वाकडे नेले जाणार आहे.**
> **- पुनिता गुरव, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), रायगड जिल्हा परिषद**

## दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार

| पुणे | प्रतिनिधी |

पुण्यात चालत्या स्कूल व्हॅनमध्ये चालकाने दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. शहरातील वानवडी परिसरात हा धकादायक प्रकार उघडीस आला आहे. वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांनी या प्रकरणातल्या आरोपीची स्कूल व्हॅन फोडली आहे. आरोपी समोर आला तर असाच धडा शिकवू, असा इशाराही कार्यकर्त्यांनी दिला. वानवडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत कार्यकर्त्यांना ताब्यात घेतलं आहे.

मागच्या महिन्यात बदलापूर येथील एका शाळेत दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराची घटना घडली होती. त्यानंतर बदलापूरमध्ये पान २ वर

### बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरण

## उदय कोतवाल, तुषार आपटेंना जामीन

| नेरळ | प्रतिनिधी |

बदलापूरमधील एका नामांकित शाळेत झालेल्या चिमुकल्यांवरील अत्याचार प्रकरणात सहआरोपी असलेले शाळेचे अध्यक्ष उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे यांना ४४ दिवसानंतर अटक करण्यात आली. आज न्यायालयात त्यांना हजर केले असता न्यायालयाने त्यांना एका प्रकरणात जामीन मंजूर केला आहे. तर दुसऱ्या एका प्रकरणात पोलिसांनी त्यांना लगेच अटक केली आहे. त्याआधी न्यायालयाने दोघांनाही १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती. या कोठडीविरोधात त्यांनी जामिनासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने एका प्रकरणात जामीन तर दुसऱ्या प्रकरणात अटकेची परवानगी दिली आहे.

**दुसऱ्या प्रकरणात मात्र अटक**

सरकारी वकील भामरे पाटील म्हणाले की, बदलापूर अत्याचार प्रकरणात दोन एफआयआर दाखल झाले होते. गुन्हा क्रमांक ३८० मध्ये दोन्ही आरोपींना जामीन मिळाला. त्यानंतर गुन्हा क्र. ३८१ मध्ये त्यांना अटक करण्यात आली आहे. आता दुसऱ्या प्रकरणातील जामिनावर उद्या सुनावणी होईल. त्यामुळे कोतवाल आणि आपटे यांना जामीन मंजूर झाला असला तरी आज कोठडीतच राहावे लागणार आहे.

बदलापूरशहरातएकानामांकित शाळेत झालेल्या चिमुकल्यांच्या अत्याचार प्रकरणानंतर देशभरात गदारोळ झाला. याप्रकरणी पालकांनी संबंधित अत्याचाराच्या प्रकरणाबद्दल माहिती देऊनही शाळेच्या मुख्याध्यापिका, संस्थेचे अध्यक्ष आणि सचिव या जबाबदार व्यक्तींनी दुर्लक्ष केले. २० ऑगस्ट रोजी शहरात झालेल्या उत्स्फूर्त आंदोलनानंतर न्यायालयाने त्याची दखल घेत या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या शाळेच्या संचालकांवरही गुन्हा दाखल करण्याचा निर्णय घेतला. २० ऑगस्ट रोजी शाळेच्या आवारात झालेल्या तोडफोडीची पाहणी करणारे संस्थेचे अध्यक्ष उदय कोतवाल आणि तुषार आपटे दुसऱ्याच दिवसापासून फरार होते. सुरुवातीला कल्याण सत्र न्यायालयात या दोन्ही आरोपींनी अटकपूर्व जामीनासाठी पान २ वर

### तरूणांच्या भवितव्यासाठी रस्त्यावर उतरण्याचा दिला इशारा

# व्यसनाधिनतेचा बंदोबस्त करण्यासाठी शेकाप सज्ज

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यात सत्ताधारी अशांतता माजविण्याची व तरुण पिढी बरबाद करण्याची कुटिल खेळी खेळत आहेत. मात्र या भस्मासुराचा बंदोबस्त करण्यासाठी शेकाप सज्ज झाला आहे. तरुणांसाठी त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी रस्त्यावर उतरु, यासाठी एक नाही शंभर गुन्हे दाखल झाले तरी चालेल, मात्र माझ्या कुटूंबातील लेकरं चुकीच्या मार्गाने जात असतील, त्यांचे भविष्य बिघडत असेल तर कदापी सहन करणार नाही, असा सज्जड इशारा शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी दिला आहे.

आजच्या स्थितीत तरुणांमधे नशेचे प्रमाण वाढून अतोनात नुकसान होत आहे. नशा आणि आनंदाच्या नावाखाली पार्टीत घुसखोरी केलेले नशेचे पदार्थ भयानक रुप घेत आहे. धक्कादायक म्हणजे आपल्याच अनेक विघातक शक्तीही यात उतरल्याने हा तरुण विक्राळ रूप धारण करत आहेत. कुटूंब उध्वस्त होत आहेत.

व्यसनाचे जिल्ह्यात एक नवे संकट दाखल झाले आहे. सत्ताधारी मात्र या गंभीर प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यापासून पान २ वर

### आज शेकापचा निषेध मोर्चा

**पेझारी येथील मोर्चात शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांचा अपमान केला. महिलेला दिलेल्या अपमानास्पद वागणुकीविरोधात शेकापच्या महिलांमध्ये संतापाची लाट उसळली असून शिंदे गटाविरोधात निषेध नोंदविण्यासाठी आज पेझारी नाक्यावर शेकाप महिला पदाधिकाऱ्यांनी मोर्चाचे आयोजन केले आहे. परिणामी, विभागातील महिलांनी सायंकाळी ४ वाजता पेझारी नाक्यावर मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भैरवी पाटील यांनी केले आहे.**

### रोजगारावर टाच



रायगड जिल्ह्यात बेरोजगारीची स्थिती भीषण आहे. शिक्षण घेतले पण नोकरी नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. मोलमजूरी करुन, प्रसंगी पोटाला चिमटा काढून पालकांनी शिक्षण दिले, आणि सरकारने रोजगाराचे केवळ आश्वासन. बेरोजगारीच्या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेत शेतकरी कामगार पक्षाने हजारो तरुणांच्या हाताला काम दिले, संसार उभा केला. कोणतंही राजकारण न करता केवळ समाजहितासाठी, तरुणांच्या उज्वल भवितव्यासाठी शेकाप काम करीत आहे. मात्र केवळ विरोधी भावना ठेऊन विरोधकांनी सत्तेचा गैरवापर करीत रायगड जिल्हा मध्यवर्ती बँकेतील नोकरभरती प्रक्रियेला विरोध केला आणि सत्तेच्या जोरावर नोकरभरतीला स्थगिती दिली. व्यसनाधीन तरुणांचे भविष्य बिघडविणाऱ्या सत्ताधाऱ्यांमुळे आज अनेक कुटूंबे उध्वस्त झाली आहेत. त्यामुळे तरुणांची दिशाभूल करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना महिला योग्य ती जागा दाखवतील, असा इशारा पेझारीच्या सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सायली भगत यांनी दिला आहे.

> **तरुण व्यसनाच्या आहारी जात आहेत. ही बाब लक्षात घेऊन शेकापच्या जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी व्यसनमुक्तीसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. मात्र विरोधकांनी त्यांचा आवाज दाबण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. या घटनेने कोणीही घाबरुन बसणार नाही तर अधिक जोमाने व्यसनमुक्तीसाठी धडपडणाऱ्या चित्रलेखा पाटील यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहू.**
> **- प्रतीक्षा पाटील, अलिबाग**

## महावितरण कर्मचाऱ्यांची निदर्शने

| अलिबाग | प्रतिनिधी |

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जाचातून महावितरण विभागातील अभियंता यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. वरिष्ठांचा दबाव कामाच्या ताणामुळे हा प्रकार घडल्याचा आरोप करीत अलिबागमधील महावितरण विभागातील कर्मचाऱ्यांनी निषेध व्यक्त करीत कार्यालयासमोर निदर्शने केली. अलिबाग महावितरणच्या सबॉर्डीनेट इंजिनिअर्स असोसिएशन तर्फे आयोजित केलेल्या या आंदोलनात असंख्य कर्मचारी सहभागी झाले होते.

नांदेड येथील कार्यालयाअंतर्गत हिंगोली येथे सचिन कोळपे कार्यरत होते. एक ऑक्टोबर रोजी नांदेड येथील मुख्य अभियंता नांदेड डोये यांनी ऑनलाईन बैठक घेतली. या बैठकीत अभियंता सचिन कोळपे यांना अर्वाच्च भाषेत बोलून कारवाई करण्याची धमकी दिली. त्यामुळे कोळपे यांना हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन ते खुर्चीत कोसळले. त्यांना तातडीने हिंगोली येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. परंतु तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून अगोदरच मृत असल्याचे घोषित केले. महावितरण विभागातील कर्मचारी अपुरे मनुष्यबळ असूनदेखील रात्रीचा दिवस करून सेवा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. कर्मचाऱ्यांची रिक्त पदे न भरल्यामुळे कार्यरत कर्मचारी व अधिकारी यांच्यावर अतिरिक्त कामाचा ताण वाढत आहे. तरीदेखील शंभर टक्के कामाची अपेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून केली जात आहे. या प्रकाराला कोळपे बळी पडून त्यांचे निधन झाले. वरिष्ठांच्या धमकी व जाचामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांचे आरोग्य पान २ वर

पान १ वरून

## फणसाड अभयारण्यात महाराष्ट्रातील पहिले ‘हर्प काऊंट’

वन्यजीव येथे आढळतात. हे अभयारण्य जणू वनसंपदेचे आगारच म्हणता येईल.

या सर्वेक्षणात ग्रीन वर्कचे संस्थापक अध्यक्ष निखिल भोपाळे त्यांची संपूर्ण टीम तसेच नांदगाव वनपाल आदेश पोकळ, वनरक्षक अरुण पाटील, संतोष पिंगळा, वनमजुर प्रदीप बगाडे, सदानंद नाईक आदींनी तिसऱ्या निरीक्षणात ४ किमी जंगलाची पायवाट तुडवित प्राणी व पक्ष्यांच्या नोंदी घेतल्या. संपूर्ण कार्यक्रम पूर्णपणे पेपरलेस झाला. सरपटणारे प्राणी आणि उभयचर प्रजातींचे रेकॉर्ड लॅपटॉपमध्ये दाखल झाले आणि शेवटच्या दिवशी सहभागींना ई-प्रमाणपत्रे देण्यात आली. सर्वेक्षणादरम्यान, भारतीय फ्लॅपशेल कासव आणि कॉमन सँड बोआ प्रथमच अभयारण्यात आले असल्याची माहितीही प्राप्त झाली.

तीन दिवसीय सर्वेक्षण कार्यक्रमात भूपृष्ठावर सरपटणाऱ्या प्रजातींमध्ये मुख्यतः साप १६, बेडूक २०, सस्तन प्राणी १०, ७ गेको, ३ मॉनिटर सरडे, १ स्किंक आणि १ गिरगिटासह ४५ नागीण, पाली ४, घोरपड ३, फुलपाखरु ५० व १०४ प्रकारचे पक्षी नोंदविण्यात आले. प्रजातींची नोंद करण्यात आली. हा एक अनोखा अनुभव सहभागींनी बोलून दाखवला. ग्रीन वर्क्स ट्रस्टचे संस्थापक आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. निखिल भोपळे यांनी बेडकांच्या प्रजाती ओळखण्यावर एक सत्र आयोजित केले. ज्यामुळे सहभागींना सर्वेक्षणादरम्यान बेडूक ओळखण्यास मदत झाली.

## माजी सरपंचाकडून लाखोंचा अपहार

लाखो रुपयांचे बील काढले. प्रत्यक्षात मात्र ही कामे झालीच नसल्याचा आरोप सुनील पिंगळे यांनी केला. याबाबत प्रशासनाकडे लेखी तक्रार करण्यात आली. जिल्हा प्रशासनासह तालुका प्रशासनाकडून चौकशी करण्यात आली. माजी ग्रामसेवक सुनील म्हात्रे यांच्या अहवालानुसार अनंत पाटील यांनी २९ लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले. चौकशी अहवालानुसार कायम स्वरुपी दोन लाख नऊ हजार ८२९ रुपये तसेच संशयीत २७ लाख नऊ हजार २८२ रुपयांचा अपहार केल्याचा ठपका गट विकास अधिकारी डी. एन. दाईंगडे यांनी ठेवला आहे.

## उदय कोतवाल, तुषार आपटेंना जामीन

अर्ज केला होता. मात्र त्यांचा अर्ज फेटाळल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

बदलापूर येथील अल्पवयीन बालकांच्या लैंगिक अत्याचारप्रकरणी पॉस्को अंतर्गत गुन्हा दाखल आहे. बदलापूर येथील आदर्श विद्या मंदिर संस्थेचे पदाधिकारी हे गेली महिनाभर फरार असून त्यांच्या शोधासाठी पोलिसांच्या अनेक टीम कार्यरत होत्या. २ ऑक्टोबर रोजी कर्जत कल्याण रस्त्याने प्रवास करीत असल्याची माहिती ठाणे येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या युनिट चारला मिळाली होती. त्यामुळे सायंकाळी सहापासून ठाणे येथील गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलिस कर्जत भागात तैनात होते. रात्री साडेआठच्या सुमारास तुषार आपटे आणि उदय कोतवाल यांच्यातील फोन कॉलनंतर पोलीस ॲक्शन मोडमध्ये आले. त्यांनी कर्जत कल्याण रस्त्यावरील वांजळे गावाच्या हद्दीत वाहनांमधून प्रवास करीत असलेल्या तुषार आपटे आणि उदय कोतवाल यांच्या गाडीचा पाठलाग करून गाडीचा ताबा घेतला. त्यानंतर नऊ वाजता त्याबाबत कर्जत पोलीस ठाणे येथे जात आपटे आणि कोतवाल यांना वांजळे येथे पकडले असल्याची नोंद पोलीस ठाणे डायरीत करण्यात आली.

## दोन अल्पवयीन मुलींवर अत्याचार

आगडोंब उसळला होता. या प्रकरणातल्या आरोपीचा पोलिसांनी एन्काऊंटर केला आहे. हे प्रकरण ताजे असतानाच आता पुण्यामध्ये अशीच घटना घडली आहे. पुण्याच्या घटनेतील आरोपी हा एका नामांकित शाळेतील विद्यार्थ्यांना व्हॅनमधून शाळेत सोडण्याचे काम करत होता. आरोपीच्या व्हॅनमध्ये दोन्ही पीडित मुलींना तो पुढच्या सीटवर बसवत असे. दोन्ही मुलींना जवळ बसवून त्यांच्यासोबत अश्लील चाळे करत होता. या विषयाची वाच्यता कुठे केली तर धमकीसुद्धा देत असल्याची माहिती समोर आली आहे.याप्रकरणी प्रकरणी ४५ वर्षीय स्कूल व्हॅन चालकावर वानवडी पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तो सहा वर्षांच्या चिमुरडीसह तिच्या मैत्रिणीवर गेल्या चार दिवसांपासून चालत्या गाडीत लैंगिक अत्याचार करत होता, अशी प्राथमिक माहिती आहे. पीडित अल्पवयीन मुलगी जेव्हा घरी आली तेव्हा तिने तिच्या प्रायव्हेट ठिकाणी वेदना होत असल्याचं सांगितलं. त्यानंतर मुलीच्या आईने याची विचारपूस केल्यानंतर आरोपीने केलेलं कृत्य अल्पवयीन मुलीने आईला सांगितलं. यानंतर हा सगळा धक्कादायक प्रकार समोर आला.

## महावितरण कर्मचाऱ्यांची निदर्शने

धोक्यात येण्याची चिंता व्यक्त करीत या घटनेचे निषेध महावितरण कर्मचाऱ्यांकडून करण्यात आला आहे. अलिबागमधील चेंढरे येथील कार्यालयासमोर अलिबाग विभागातर्फे सर्व अभियंत्यांनी घोषणा देत निदर्शने केली. महावितरणचे मंडळ सचिव श्रीपाद कुलकर्णी, विभागीय सचिव ओमप्रकाश सावडे, विभागीय अध्यक्ष निखीलेश शेंडे आदी पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांची तयार होणार ‘एज्युकेशन हिस्ट्री’

परिषद (एमपीएसपी) सूचना देण्यात आल्या असून त्यांच्याकडून प्रत्येक जिल्हा परिषदेला अपार आयडी प्रकल्पाबाबत अवगत करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या तयार करण्यात येणाऱ्या १२ अंकी अपार याडीचे काम सुरू करण्यापूर्वी जिल्हा परिषद आणि महानगरपालिका शिक्षण विभागातील संगणक विभागाच्या समन्वयकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ऑक्टोबरमध्ये हे प्रशिक्षण मुंबईत होणार असून याबाबत सूचना जिल्हा परिषद शिक्षण विभागाला प्राप्त झाल्या आहेत.

विद्यार्थ्यांचा अपार आयडी तयार झाल्यावर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक रेकॉर्ड तयार होणार असल्याने त्यांचे एका शाळेतून दुसऱ्या शाळेत होणारे स्थलांतर, जिल्ह्याबाहेर व राज्याबाहेर होणाऱ्या स्थलांतरासह अन्य महत्वाचे ऑनलाईन रेकार्ड तयार होणार आहेत. यामुळे कोणत्या शाळेत किती पटसंख्या आहे. ती कमी किंवा जास्त याची माहिती सरकारला ऑनलाईन पाहता येणार आहे.

**डिजीटल स्वरूपात माहिती उपलब्ध होणार**

नव्याने विद्यार्थ्यांच्या तयार होणाऱ्या अपार आयडीमुळे त्यांना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सुविधांसह त्यांची अभ्यासातील प्रगतीचा अहवाल, शाळाबाह्य विद्यार्थ्यांची माहिती, प्रत्येक शाळेचा पट, शाळा गळतीचे अचूक प्रमाण आदीची माहिती ही डिजीटल पध्दतीने सरकारच्या नियंत्रणात उपलब्ध होणार आहे. यामुळे भविष्यातील विद्यार्थ्यांचे धोरण आखतांना या माहितीचा मोठा उपयोग होणार आहे.

## व्यसनाधिनतेचा बंदोबस्त करण्यासाठी शेकाप सज्ज

फारच दूर आहे. उलट या प्रश्नावर आवाज उठविणाऱ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सत्ताधाऱ्यांकडून केला जात आहे.
राजकीय इच्छाशक्तीची गरज

नशेच्या या भस्मासुराचा बंदोबस्त करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दाखविण्याची आणि राज्य व केंद्राने समन्वयाने काम करण्याची गरज आहे. रिकाम्या हातांना काम उपलब्ध करून देणे हा भरकटलेल्या तरुणाईला योग्य मार्गावर आणण्याचा एक महत्वाचा उपाय आहे. मात्र सत्ताधारी रोजगारावर बोलायला तयार नाहीत. तर व्यसनाधीन तरुणांच्या भविष्यावर केलेले भाष्य यांच्या पचनी पडले नाही. व्यसनाधीन तरुणांना योग्य मार्ग दाखविण्याऐवजी सत्ताधारी व्यसनाधीन तरुणांना पाठीशी घालत आहेत, ही लाजिरवाणी बाब आहे. याविरोधात लढत असताना सत्ताधारी विघातक शक्ती सामाजिक समतोल आणि आरोग्य बिघडवण्याचा छुपा मार्ग अनुसरत आहेत. याला तोंड देण्यासाठी शेकाप खंबीरपणे उभा आहे, वेळ पडल्यास रस्त्यावरही उतरेल. मात्र या लढ्यात फक्त शेकापलाच नाही तर सर्वांनाच तयार व्हावे लागेल, असे मत सामाजिक कार्यकर्त्या विद्या विलास म्हात्रे यांनी व्यक्त केले.

**महिलांचा अनादर**

सत्ताधारी पक्षाने कायमच महिलांचा अनादर केला आहे. मंत्रिमंडळ विस्तापनातही सत्ताधाऱ्यांनी महिलांवर अन्याय केला. तर अनेक महिला पदाधिकाऱ्यांनी योग्य वागणूक न मिळाल्यामुळे पक्षाला सोडचिठ्ठी दिली. त्यामुळे स्वतःच्या पक्षातील महिलांचाच अनादर करणारे सत्ताधारी अन्य पक्षातील महिलांचा काय आदर करणार, असा संतप्त सवाल तरुणांनी उपस्थित केला आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक वत्सलाबाई विष्णु बोराडे यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे खांडपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र(हे.आर. पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ९२ | २/ब/२ | ०-६७-१० | ६-९४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता.०४/१०/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो.९४२२०६८७५५

### जाहीर नोटीस

अर्ज क्र. १३९/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. प्रशांत प्रकाश खैरे
वय: ३८ वर्षे, धंदा शेती.
रा. महादपोली, पो. देगांव, — अर्जदार
ता. माणगांव जि. रायगड.

विरुध्द

१. निबंधक जन्म - मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. प्रशांत प्रकाश खैरे यांचा जन्म मौजे महादपोली, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २८/०७/१९८६ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. २४/०७/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे महादपोली, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २८/०७/१९८६ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. प्रशांत प्रकाश खैरे यांचा जन्म मौजे महादपोली, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २८/०७/१९८६ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव — सही/-
ता. २४/०९/२०२४ — **कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमीन प्लॉटिंग स्वरूपात खरेदीने घेण्याचे ठरविले आहे व त्याप्रमाणे मिळकतीचे मालक यांचेसोबत समजुतीचा करारनामा लिहून ठेवला आहे.

मौजे बेलकडे, तलाठी सजा बेलकडे, तालुका अलिबाग, जि. रायगड यांचे हद्दीतील खालीलप्रमाणे वर्णनाची मिळकत जिचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्र. व उपविभाग | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| मौजे-बेलकडे तलाठी सजा बेलकडे, ता. अलिबाग जि. रायगड | ४२० | -- | २.०५.९० पो.ख. ०.१४.२० एकूण २.२०.१० | २९.१९ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, बक्षिसपात्र, लिज वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ०४/१०/२०२४

सही/-
अशिलांतर्फे
**ॲड. जी.जी. गोंधळी**
गोंधळी निवास, बाजारपेठ
ता. अलिबाग, जि. रायगड

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

### मिळकतीचा जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव मंगळवार दिनांक ०५/११/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु. ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून दिनांक ०४/११/२०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार** १. श्री. घनयाम मधुकर समेळ पत्ता:-कासार आळी मडलीक रोड ता. पेण, जि. रायगड **जामिनदार -** २. श्री. महेश रविंद्र वडके पत्ता:- कासार आळी मडलीक रोड ता.पेण, जि. रायगड ३. श्री.अविनाश महादेव पाटील पत्ता:-मु. पेझारी, पो. पोयनाड ता.अलिबाग, जि. रायगड | अर्ज क्र. ६०/२२ ५२३ जा.क्र. सनिपे/वशी-१ /१०१/सन २०२३ दिनांक १५-०३-२०२३ | रु.१८,३१,४४५/- | मौजे नगरपरिषद पेण यांच्या हद्दीतील श्री. घनयाम मधुकर समेळ यांच्या नावे असलेले मालमत्ता (घर) क्र.१४६१ क्षेत्र ४८.६१३ चौ.मी. ता.पेण, जि. रायगड |

**स्थावर मालमत्ता जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास लिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेंत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उद्घोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : ०४/१०/२०२४

**श्री.अजित नामदेव भगत**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

### मिळकतीचा जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव मंगळवार दिनांक ०५/११/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु. ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून दिनांक ०४/११/२०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार** १.मो.नफीसा मुक्तार पठाण, पत्ता :-मु.श्रीगांव पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड २. मो.मुक्तार अब्दुल पठाण पत्ता :- मु.श्रीगांव, पो.पोयनाड ता.अलिबाग, जि. रायगड **जामिनदार** ३. मो.मेहबुब नादरखान पठाण पत्ता :-मु. सोगांव, पो. मापगांव ता.अलिबाग, जि.रायगड ४.श्री. प्रभाकर बाळाराम म्हात्रे पत्ता :- मु.बोरीफाटा पो.वडखळ ता. पेण, जि. रायगड ५. मो.अकबर बशीर कुरेशी पत्ता :-मु. पो.थळ, ता. अलिबाग, जि. रायगड | अर्ज क्र. कलम १०१/२०११-२२/ १६९१/अलिबाग दिनांक १५/०७/२०२१ | रु.२५,३५,०००/- रु. ३,४५,६००/- | मौजे चरी ग्रामपंचायत हद्दीतील घर क्र.२९१ क्षेत्र १९५० चौ. फुट ही मालमत्ता मौजे श्रीगांव ग्रामपंचायत हद्दीतील घर क्र. ८९८ क्षेत्र ४३२ चौ.फुट ही मालमत्ता |

**स्थावर मालमत्ता जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास लिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेंत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उद्घोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : ०४/१०/२०२४

**श्री.लंकेश भगवान नागांवकर**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

निवडक

## दोन मुलांसह पत्नी बेपत्ता

**पनवेल :** सादमानी मोहम्मद अखिल अलवी (२२) असे बेवत्ता महिलेचे नाव असून रंगाने गोरी, उंची ५ फुट १ इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे असून अंगात लाल रंगाचा सुट सलवार त्यावर काळ्या रंगाचा बुरखा, तसेच पायात काळ्या रंगाची चप्पल आहे. सोबत मुलगा अबुजर (४) व मुलगी आयत (३) हे आहेत. या तिघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्यात (२७४५२३३३) किंवा पो.हवा.अतुल देवकर यांच्याशी संपर्क साधावा.

## तैलिक महासभेचा मेळावा

**पनवेल :** महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचा रायगड जिल्हास्तरीय संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याचप्रमाणे ४ ऑक्टोबर रोजी पुणे येथे श्री संत संताजी महाराज जगनाडे समाधी स्थळ, श्री क्षेत्र सुदुंबरे विकास व सौदर्यीकरण विकास आराखडा भूमिपूजन समारंभ होणार आहे. या समरंभासाठी समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन या बैठकीत करण्यात आले. यावेळी गणेश महाडिक, सुनील खळदे, रत्नप्रभा पिंगळे यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

## मेफेड्रॉन विकणाऱ्यांना अटक

**पनवेल :** अमली पदार्थ विकण्यासाठी आलेल्या दोघांना पनवेल शहर पोलिसांनी उलवे सेक्टर-२५ ए भागात शनिवारी सायंकाळी सापळा लावून अटक केली आहे. विरेंद्र सुंदर पुजारी (४५) आणि नरेश कुमार बलजीत सिंग (३९) अशी आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याजवळ सापडलेले ७१.३ ग्रॅम वजनाचे १४ लाख २५ हजार रुपये किमतीचे मेफेड्रॉन (एमडी) व दोन मोबाईल फोन जप्त केले आहेत. यानंतर त्यांच्या विरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## मोबाईल, इयरफोनची चोरी

**पनवेल :** तन्मय रोडे हा खारघर येथे त्याच्या मित्रांसोबत राहतो. सकाळी सोबत असलेले मित्र रूममधून निघून गेले व जाताना रूमचा दरवाजा फक्त ढकलून गेले होते. त्यानंतर मोबाईल स्टडी टेबलवर ठेवून त्याच्यासोबत इयरफोन चार्जिंगला लावून रोडे अंघोळीला गेला. आंघोळ करून बाहेर आला असता मोबाईल आणि इयरफोन दिसून आले नाहीत. ४0 हजार रुपये किंमतीचा मोबाईल व ९00 रुपये किमतीचे इयरफोन चोरीला गेल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अपघातात दोन महिला जखमी

**पनवेल :** पनवेल परिसरात दोन वेगवेगळ्या झालेल्या अपघातात दोन महिला जखमी झाल्याची घटना पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. पनवेल शहराजवळील पंचमुखी मारुती मंदिर येथे एका भरधाव अज्ञात वाहनाने एका मुलीस ठोकर मारल्याने झालेल्या अपघातात ती जखमी झाली आहे. तर दुसऱ्या घटनेत मनीषा पांडे यांच्या दुचाकीला ट्रेलरने धडक दिल्याने त्या जखमी झाल्या असून त्यांच्यावर गांधी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

### आंबा, काजू उत्पादक

# शेतकऱ्यांना विम्याची प्रतीक्षा

**प्रमोद जाधव**
**। अलिबाग ।**

हवामानाच्या धोक्यापासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे यासाठी आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांनी गतवर्षी विमा उतरविला होता. भारतीय कृषी विमा कंपनीकडून हा विमा काढण्यात आला होता. मात्र, रायगड जिल्ह्यातील आंबा, काजू उत्पादक ६ हजार ३२९ शेतकऱ्यांना अद्याप विम्याची रक्कमच मिळाली नसल्याची माहिती समोर येत आहे. फळपिक उत्पादक शेतकऱ्यांना विम्याची प्रतिक्षा लागून राहिली आहे.

रायगड जिल्हयामध्ये १४ हजार हेक्टर आंबा उत्पादक क्षेत्र असून काजू लागवडीवर देखील मोठ्या प्रमाणात भर दिला जात आहे. जिल्ह्यातील तरुण मंडळीदेखील फळ लागवड करण्यावर लक्ष देत आहेत. या लागवडीतून उत्पन्नाचे साधन मिळण्याचा मार्ग मोकळा होत असल्याने आंबा लागवडीचे क्षेत्रही दिवसेदिवस वाढण्याच्या वाटेवर आहे. जिल्ह्यात बदलत्या हवामानाचा आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांना कायमच बसत आला आहे. मोहर गळून पडणे, अवकाळी पाऊस पडणे अशा अनेक कारणांमुळे फळ पिक लागवडीवर परिणाम होतो. यामुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट निर्माण होते. फळ पिकांच्या झालेल्या नुकसानीला रोखण्यासाठी शासनाने पुनर्रचित हवामान अधारित फळपिक विमा उतरविण्याचे आवाहन केले. त्यानुसार जिल्ह्यातील आंबा, काजू उत्पादक शेतकऱ्यांनी भारतीय कृषी विमा कंपनीकडून विमा उतरविला. मात्र, जिल्ह्यातील नुकसान झालेल्या आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना अद्याप विमा मिळाला नसल्याची माहिती समोर येत आहे. जिल्ह्यातील आंबा उत्पादक ६ हजार १३५ व १९४ शेतकऱ्यांना विम्याची प्रतिक्षा लागून राहिली आहे.



> **पैसे मिळावे म्हणून सोमवारी राज्यातील कृषी सचिव जयश्री भोज यांना निवेदन सादर करून कोकणातील आंबा, काजू, बागायतदारांचे फळपिक विम्याची भरपाई मिळावी यासाठी लेखी मागणी केली आहे.**
> **– चंद्रकांत मोकल, अध्यक्ष, महारााष्ट्र राज्य आंबा उत्पादक संघ**

विमा कंपनीला पैसेही उपलब्ध झाले आहेत. मात्र, या कंपनीकडून अजून पंधरा दिवस विम्यासाठी वाट पहावी लागणार असल्याची माहीती खात्रीशीर सुत्रांकडून देण्यात आली आहे. विम्याबाबत माहिती घेण्यासाठी प्रभारी कृषी अधिकारी कैलास वानखेडे यांच्याशी संपर्क साधला, परंतु, संपर्क होऊ शकला नाही.

### भातशेती विम्याकडे २२ हजार शेतकऱ्यांची पाठ

रायगड जिल्हयामध्ये भाताचे सुमारे ९८ हजार हेक्टर क्षेत्र आहे. एक लाखाहून अधिक शेतकरी आहेत. जिल्ह्यात अतिवृष्टीसह अवकाळी पावसामुळे भात पिकांचे प्रचंड नुकसान होते. हे नुकसानीची भरपाई मिळावी यासाठी एक रुपयात विमा उतरविण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले होते. यावर्षी फक्त ३९ हजार शेतकऱ्यांनी विमा उतरविला. गतवर्षीच्या तुलनेने यावर्षी विमा उतरविण्यास अल्प प्रतिसाद मिळाला. गेल्या वर्षी पेक्षा २२ शेतकऱ्यांनी पाठ फिरविल्याची माहिती उपलब्ध होत आहे.

### अधिकाऱ्यांचा कारभार प्रभारीच्या भरोवश्यावर

शासनाच्या जिल्हा कृषी अधिकारी तथा अधिक्षक बाणखेले यांची बदली होऊन अनेक महिने होऊन गेले आहेत. त्यांच्या जागी आत्मा विभागाच्या वंदना पाटील यांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु, त्यादेखील रजेवर गेल्या आहेत. यामुळे गेल्या अनेक महिन्यांपासून कृषी विभागाचा कारभार उपविभागीय कृषी अधिकारी वानखेडे यांच्या भरोवश्यावर चालू आहे. पूर्णवेळ अधिकारी नसल्याने कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली असून प्रभारी अधिकारी त्यांच्या कामात इतके व्यस्त असतात की त्यांना शेतकऱ्यांचा फोन उचलायला देखील वेळ मिळत नसल्याची माहिती समोर येत आहे.

# कोल्हारे ग्रामपंचायत विरोधात उपोषण



■ **सरपंचांवर कारवाईची मागणी**

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायत विरोधात रायगड जिल्हा परिषद समोर जानेवारीमध्ये उपोषण करण्यात आले होते. यावेळी राजिपचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसमोर दिलेले लेखी आश्वासन पाळले गेले नसल्याने धामोते गावातील संजय विरले यांनी पुन्हा उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, हे उपोषण ८ ऑक्टोबर रोजी नेरळ-कळंब राज्यमार्गावरील साईबाबा चौकात होणार असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

ग्रुप ग्रामपंचायत कोल्हारे येथील धामोते गावातील खुल्या जागेत अतिक्रमण करून घरे बांधण्यात आली आहेत. यामुळे ग्रामस्थ संजय विरले यांच्या घराकडे जाणारा रस्ता बंद झाला होता. म्हणुन संजय विरले यांनी जानेवारी महिन्यात कर्जत येथे उपोषण केले होते. यावेळी कर्जत पंचायत समितीने आठ दिवसात रस्ता खुला करून देण्याची कार्यवाही केली जाईल, असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, ग्रामपंचायतीकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्याने विरले यांनी रायगड जिल्हा परिषद समोर उपोषण सुरू केले. संबंधीतांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

# पनवेलमध्ये शेकापचे विविध कार्यक्रम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्ष तळोजा फेज दोनच्या अध्यक्षा दिलीप जाधव आणि पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक ज्ञानेश्वर पाटील, प्रसाद ढगे पाटील, जयेश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि.२) विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोकण शिक्षक मतदार संघाचे मा. आ. बाळाराम पाटील यांना राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र विधान मंडळाच्यावतीने उत्कृष्ट भाषण पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी साई ब्लड बँक यांच्यावतीने भव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १०३ लोकांनी रक्तदान केले. याचबरोबर भीमा चव्हाण यांच्यामार्फत मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रामुख्याने यामध्ये मधुमेह, रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, थायरॉईड आदींची तपासणी करण्यात आले. पनवेल मधील नामांकीत संस्था आर. आर. झुंजूनवाला आय हॉस्पिटलच्यावतीने मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. तसेच, ज्या रुग्णांना चष्म्याची गरज आहे त्यांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तळोजा मधील महिला बचत गटांना मोफत महिला उद्योग शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले होते. यावेळी पनवेल विधानसभा अध्यक्ष काशिनाथ पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख बबन पाटील, पनवेल काँग्रेसचे अध्यक्ष सुदाम पाटील, माजी आमदार दत्तूशेठ पाटील उपस्थित होते.





# तंबूमध्ये घबराट

हरियाणाची निवडणूक होत आहे. पण तिकडे बहुदा भाजपची डाळ काही शिजेना. कशाला तिकडे आणखी वेळ घालवायचा असा विचार झालेला दिसतो. म्हणून अमित शाह यांचे सारखे महाराष्ट्रात दौरे चालू आहेत. सारखे कार्यकर्त्यांना चुचकारणे चालू आहे. काल मुंबईत म्हणाले, २०२९ ला नक्की भाजप एकट्याच्या बळावर सत्तेत येणार. यंदा मात्र आपल्या मित्रपक्षांसाठी काम करावे लागणार. तसे केले तरच आपण सत्तेत येऊ. लोकसभेपूर्वीची यांची भाषा आठवा. अबकी बार चारसो पारचे भूत डोक्यावर होते. सगळे गडी माजात होते. मोदींच्या नावावर सगळा महाराष्ट्र आणि भारत धुवून काढणार अशी गुर्मी होती. पंतप्रधान शरद पवारांना भटकती आत्मा म्हणत होते. अमितभाई सालाबादप्रमाणे काँग्रेसने आणि पवारांनी महाराष्ट्रासाठी काय केले असे विचारत होते. लोकांचा मूड वेगळा होता. पण त्यांना लोकांचे ऐकायचे नव्हते. त्यांना फक्त स्वतःचाच आवाज ऐकायचा होता. शेवटी लोकांना यांच्या कानात फटाके फोडावे लागले. चार जूनला यांची बोलती बंद झाली. लोकसभेला एकटा भाजप देशात ३७० जागा जिंकणार होता. आता अमित शाह निदान तीन चाकांची रिक्षा तरी चालायलाच हवी अशा विनंत्या करीत आहेत. कार्यकर्त्यांच्या हातापायाच पडायचे बाकी आहे. कार्यकर्ते भयंकर नाराज आहेत. गेल्या तीन वर्षात पालिका, जिल्हा परिषदा, पंचायती यांच्या निवडणुका झालेल्या नाहीत. कार्यकर्त्यांच्या हाती काही लागलेले नाही. राज्याची सत्ता हातात आहे. पण कार्यकर्त्यांना काय मिळाले हा प्रश्न आहे. त्यातच गेल्या तीन वर्षात फोडाफोडी केली. शिवसेना फोडली तेव्हा गंमत वाटली. सत्ताही मिळाली. पण दिल्लीवाल्यांचे हिशेब आणखी वेगळे. त्यांनी राष्ट्रवादीही फोडली. कालपर्यंत अजितदादांना भ्रष्टाचारी म्हटले. त्यांच्या धरणाबाबतच्या वक्तव्यावरून इतके विनोद केले. आता त्यांनाच सोबत घेतले. मतदार नाराज होतेच. कार्यकर्तेही वैतागले. लोकसभेला त्यांनी कामच केले नाही. मतदारांनी भलत्यालाच मते दिली.

### दादा गटाची लाचारी

दादांमुळे सगळे नाराज आहेत हे तुणतुणे बराच काळ चालू आहे. लोकसभेच्या निकालानंतर लगेचच पुण्यात एक मेळावा झाला. त्यात आता दादा आले त्याबद्दलची चर्चा आता कार्यकर्त्यांनी बंद करावी असे खुद्द देवेंद्रांनी जाहीरपणे सांगितले. पण ती चर्चा तर थांबली नाहीच. उलट नेतेही आडून आडून दादांना बाहेर पडायचे सुचवायला लागले. परवा इंडिया टुडेच्या मुंबईतील कार्यक्रमात देवेंद्रही म्हणाले की, अजितदादांच्या पक्षाची मते आम्हाला मिळाली नाहीत, म्हणून लोकसभेला फटका बसला. यावर खरे तर अजितदादांकडून आक्षेप यायला हवा होता. भाजपचीही मते राष्ट्रवादीला मिळालेली नाहीत असे ते म्हणू शकले असते. कारण, सर्वाधिक पराभव त्यांचेच झाले. अगदी बारामतीत सुनेत्रा पवारही पडल्या. पण रायगडचे खासदार लाचारीने म्हणाले की, हो आमची मते भाजपच्या उमेदवारांना मिळू शकली नाहीत. कितीही मानहानी पत्करू, पण सत्तेला चिकटून राहू असे हे धोरण आहे. इतकी हाडत-हुडत झाल्यावर दुसऱ्या एखाद्या नेत्याने स्वाभिमानाचा मार्ग चोखाळला असता. असो. दादांबाबत जाहीरपणे बोलतात. पण शिंदे गटाबाबतही तितकीच खदखद आहे. ठाण्यात शिंद्यांनी भाजपवाल्यांना दाबले आहे. एकेका जागेसाठी जीव आटवावा लागतो आहे. आणि, कहर म्हणजे, भांडण झाले तर दिल्लीतले नेते शिंद्यांचीच बाजू घेतात. त्यांच्याच बाजूने निर्णय देतात. देवेंद्रांना खच्ची करायचे हेच दिल्लीवाल्यांचे मुख्य धोरण आहे. आज मेट्रोच्या उद्घाटनासाठी मोदी पुन्हा यायचे आहेत. पण हा कार्यक्रम ठाण्यात आणि तिथे मिरवणार शिंदे यांचे कार्यकर्ते. इतर कोणाच्या तरी मदतीशिवाय महाराष्ट्रात भाजपचे काही चालू शकणार नाही याची खात्री पटल्याची ही लक्षणे आहेत. लोकसभेला मोदींनी १९ सभा घेतल्या. बहुतेक ठिकाणचे उमेदवार पडले. मोदींना महाराष्ट्र धूप घालत नाही हे स्पष्ट झाले. आपला हुकुमाचा एक्काच बाराच्या भावात गेल्यामुळे भाजपच्या तथाकथित चाणक्यांना आता घाम फुटला आहे. म्हणून मग कार्यकर्त्यांना स्वबळाची स्वप्ने दाखवली जात आहेत.

### बेडकीचा बैल होत नसतो

वास्तविक, २०१४ मध्येदेखील भाजप स्वबळावरच लढला होता. तेव्हा मोदी नुकतेच सत्तेत आले होते. मोदींच्या नावावर दगडही जिंकेल असा माहोल भाजपवाल्यांनीच निर्माण केला होता. म्हणून मग आयत्या वेळी शिवसेनेसोबतची युती त्यांनी तोडली. सेनेला निवडणुकीच्या तयारीला पुरेसा अवसर मिळू नये हा त्यातला हेतू होता. पण प्रत्यक्षात स्वबळाची बेडकी फुगली नाही. बैलाइतकी झाली नाही. कोणाचा तरी टेकू घेणे अपरिहार्य झाले. पुन्हा शिवसेनेची मदत घ्यावी लागली. तेव्हा उद्धव ठाकरे म्हणाले की, युतीमध्ये आमची ३५ वर्षे सडून गेली. मुंबई पालिकेत दोन्ही पक्ष एकमेकांविरुध्द लढले. तरीही राज्यात मात्र एकत्र टिकून राहिले. इतकेच नाही तर २०१९ मध्ये पुन्हा भाजपने झक मारत युती केली. त्यामुळे भाजपचे स्वबळ किती पोकळ आहे ते सर्व जण जाणून आहेत. २०१९ मध्ये भाजपला १०५ जागा होत्या. आता जेमतेम ७० ते ८० मिळतील असे सर्वे आहेत. शिंदे यांनी शंभर जागा मागितल्या आहेत. म्हणजे भाजपला बऱ्याच ठिकाणची उमेदवारी सोडावी लागणार आहे. लाडकी बहीण योजनेचे नाव मुख्यमंत्री असे ठेवून शिंद्यांनी फुकट जाहिरात करून घेतली आहे. मोदी, राममंदिर, काश्मीर हे विषय राज्यात चालत नाहीत. आणि भाजपला दाखवण्याजोगा एकही कार्यक्रम नाही. गेल्या वेळी देवेंद्रांकडे निदान जलशिवार वगैरेसारखे विषय होते. त्याच्यात भ्रष्टाचार झाला होता ही गोष्ट वेगळी. पण यंदा प्रचाराला तितकाही काही मुद्दाच नाही. उलट फोडाफोडी, विरोधकांना धमकावणे हेच यांचे कर्तृत्व आहे. त्यात आता बदलापूर आणि मालवणचा पुतळा यांची भर पडली आहे. भाजपचे भक्तही गप्प झाले आहेत. तिकिटवाटप आणि उमेदवारीची घोषणा झाली की या अस्वस्थतेचा स्फोट होणार आहे. त्यामुळे नेत्यांच्या तंबूत घबराट उडाली असून कार्यकर्त्यांना २०२९ चा लॉलिपॉप दाखवला जातो आहे. पण २०२९ पर्यंत मोदी आणि शाह यांचे दिल्लीतील सरकार तरी राहील काय?

विचार

# माध्यमांवर अंकुश लावण्याला चाप

***माध्यमांवर अप्रत्यक्ष अंकुश लावण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने अलिकडेच वेसण घातली. उच्च न्यायालयाने केंद्र सरकारच्या 'माहिती-तंत्रज्ञान नियमावली'तील बदल बेकायदा आणि घटनाविरोधी ठरवला आहे. असे असले, तरी माध्यमे आता किती विश्वासार्ह आहेत हे ही वेळोवेळी दिसले आहे. केंद्र सरकारच्या गळ्यात कुणी तरी घंटा बांधायला हवी होती. ते काम मुंबई उच्च न्यायालयाने केले.***



**शिवाजी कराळे**

केंद्र सरकारची 'पीआयबी'यंत्रणा म्हणजे पत्र सूचना कार्यालय केंद्र सरकारच्या विविध खात्यांची माहिती प्रसारमाध्यमांपर्यंत वा थेट लोकांपर्यंत पोहोचवते. 'पीआयबी' केंद्रीय माहिती आणि प्रसारण खात्याच्या अखत्यारीत येते. तिला केंद्र सरकारने व्यापक अधिकार दिले. समाजमाध्यमांवर सरकारचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उल्लेख असलेली कोणतीही माहिती खरी की खोटी, हे तपासण्यासाठी 'पीआयबी फॅक्ट चेक युनिट' स्थापन झाले. 'पीआयबी'च्या या सत्यपरीक्षण शाखेने समाजमाध्यमांवरील कुणाचीही नोंद असत्य किंवा दिशाभूलकारक ठरवल्यास तातडीने काढून न टाकल्यास समाजमाध्यम कंपनीवरच कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार सरकारला मिळाले. राज्यघटनेत याबाबत कोणताही उल्लेख नसताना असा अधिकार देणेच मुळात चूक होते. राज्यघटनेने सरकारला हा अधिकार दिलेला नाही, असे उच्च न्यायालयाने अलिकडेच ठणकावले. समाजमाध्यमांवर खऱ्या आणि खोट्या माहितीचा धबधबा वहात असतो. अशी माहिती टाकणाऱ्यांवरच या माहितीच्या खरेखोटेपणाची जबाबदारी असते. समाजमाध्यम चालवणाऱ्या कंपनीचा या मजकुराशी संबंध नसतो. केंद्र सरकारने 'पीआयबी'ला त्याबाबतचे अधिकार देणे, हे या कंपन्यांवर दबाव आणण्यासारखे होते; परंतु त्याबाबत एकाही समाजमाध्यम कंपनीने केंद्र सरकारच्या विरोधात उच्च न्यायालयात जाण्याचे धाडस केले नाही. कुणाल कामरा या विनोदकाराने उच्च न्यायालयात धाव घेतली. प्रकरण न्यायप्रविष्ट असताना केंद्र सरकारने २० मार्च २०२४ रोजी 'पीआयबी फॅक्ट चेक युनिट'ची स्थापना करून टाकली. या कृतीला सर्वोच्च न्यायालयाने २१ मार्चला स्थगिती दिली. मुंबई उच्च न्यायालयाने त्याच्या पुढे जात हा निर्णयच बेकायदा ठरवला.

राज्यघटनेच्या अनुच्छेद १४ (कायद्यापुढे सारे समान), अनुच्छेद १९-१ (उच्चारस्वातंत्र्य) या मूलभूत हक्कांचा भंग करणारा नियम असल्याने उच्च न्यायालयाने तो रद्द ठरवला. 'पीआयबी फॅक्ट चेक युनिट'चा सरकारने घातलेला घाट हा पूर्णतः बेकायदा आणि राज्यघटनेच्या 'पायाभूत चौकटी'च्याही विरुद्ध जाणारा ठरतो. एकीकडे सरकार करत असलेली माध्यमांची मुस्कटदाबी न्यायालये रद्द ठरवत असली, तरी मुद्रित माध्यमे किती निस्पृहतेने आणि निर्भीडपणे काम करतात, हा अभ्यासाचा विषय आहे. निवडणुकीच्या काळातच नव्हे, तर एरवीही माध्यमांची विश्वासार्हता पणाला लागलेली असते. कोणत्याही सत्ताधारी पक्षाला माध्यमांचे स्वातंत्र्य डोळ्यात खुपत असते. त्यातही सत्ताधाऱ्यांनी वाकायला सांगितले, तर माध्यमे आता लोटांगण घालायला तयार असतात. निवडणुकीच्या अगोदरपासूनच जाहिरातीचा मलिदा खाण्याच्या नादात अनेक वृत्तपत्रे आपली विश्वासार्हता गमावत चालली आहेत. 'सोशल मीडिया' हा आपला स्पर्धक असून आपण खरे सांगायला तयार नसलो, तर त्यांचे व्यासपीठ लोकांना उपलब्ध आहे, हे दुर्दैवाने माध्यमांच्या लक्षात येत नाही.

गेल्या लोकसभा निवडणुकीतले चित्र पहा. देशात नरेंद्र मोदी यांच्याबाबत असे वातावरण तयार केले गेले होते, की त्यांनाच चारशेहून अधिक जागा मिळतील आणि विरोधकांना फारशा जागा मिळणार नाहीत. माध्यमांमधील बहुतांश जागा मोदी आणि भाजपला मिळत होती. 'इंडिया शायनिंग'च्या काळातही तसेच होत होते. वृत्तपत्र आणि टीव्ही चॅनल्स वारंवार काय सांगतात आणि प्रत्यक्षात ग्राऊंड रिपोर्ट काय आहे, हे भल्याभल्यांना कळले नाही. लोकसभा निवडणुकीतील काही वार्तापत्रे पाहिली. चार उमेदवार असतील, तर चारहीजणांना विजयाची समान संधी असल्याचा निष्कर्ष काढणारे महाभाग कमी नव्हते. महाराष्ट्रातही महाविकास आघाडीला एवढे यश मिळेल, असे कुणीच सांगत नव्हते. पश्चिम बंगालमध्ये तर ममता बॅनर्जी यांना धक्का बसेल, असे अंदाज लावण्यात आले होते. उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष आणि काँग्रेसला कुणीही दहापेक्षा अधिक जागा द्यायला तयार नव्हते आणि ओडिशात नवीन पटनायक यांचे पानिपत होईल, असे कोणत्याही माध्यमाला वाटले नव्हते. राजस्थानमध्ये माध्यमे काँग्रेसला जास्तीत जास्त पाच जागा द्यायला तयार होती. मध्य प्रदेशमध्येही असेच चित्र रंगवले गेले; परंतु चित्र उलटे होते. असे का होते? माध्यमांची जनमानसाशी नाळ तुटली आहे का? माध्यमे जनतेच्या प्रश्नांना हात घालत नाहीत का? सरकारची ती जास्तच तळी उचलतात का? या प्रश्नांची उत्तरे दुर्दैवाने 'हो' अशी आहेत. आपली मूळ भूमिका विसरून माध्यमे बेताल होऊ लागली आहेत. कितीही स्वातंत्र्यप्रेमी व लोकशाहीनिष्ठ राजवट असली तरी हाती चाबूक घेऊन माध्यमांना ताळ्यावर आणायला सज्ज होती. किंबहुना, कोणतेही सरकार अशा संधीची वाटच बघत असते. अशा वेळी सर्वसाधारण उदारमतवादी जनतेचाही माध्यमांच्या नावे बोटे मोडण्याचा कल असतो. आपला पाय घसरतो आहे, काही तरी चुकते आहे हे पाहण्यासाठी माध्यमांनी आत्मपरीक्षण करण्याची ती वेळ असते; परंतु ते ती करत नाहीत. आपल्या एका वार्ताहराने पत्रकारितेच्या आचाराच्या मर्यादा तोडल्या म्हणून 'न्यूयॉर्क टाइम्स'च्या दोन वरिष्ठ संपादकांनी राजीनामे दिले होते आणि 'टाइम्स'ने आठ कॉलम वृत्त प्रकाशित करुन चुकांचे विश्लेषण करत स्पष्टीकरण दिले आणि वाचकांची माफी मागितली. त्या वार्ताहराने कुठली चूक केली हे कळले, तर भारतातील अनेक पत्रकार बेशुद्ध पडतील. कारण आपल्याकडे तसल्या 'चुका' करायला वरिष्ठ संपादक उत्तेजन देतात. एवढेच नव्हे तर, वार्ताहराने सदसदविवेकबुद्धीला स्मरून ती 'चूक' करण्याचे नाकारल्यास मेमो देण्यापर्यंत मजल मारतात. 'सीबीएस'सारख्या वाहिन्यांच्या आचारसंहिता वाचूनच आपल्याकडच्या वाहिन्यांना टाळे लावायला लोक कमी करणार नाहीत, अशी परिस्थिती आहे.

लोकशाही आणि वृत्तपत्रस्वातंत्र्य यांचे नाते अतूट आहे हे अगदी बरोबर. वृत्तपत्र स्वातंत्र्य नाही, तेथे खरी लोकशाही असूच शकत नाही. वृत्तपत्रस्वातंत्र्य म्हणजे लोकशाहीचा प्राणवायू; पण स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. टीव्ही वाहिन्यांच्या आशयात काही गैर आढळल्यास शासनाकडे त्यांचे परवाने रद्द करण्याचा अधिकार असावा, असा निर्णय भारताच्या केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला होता; परंतु तो मागे घ्यावा लागला. असे असले, तरी वृत्तपत्रे आणि वाहिन्या या मीडियाच्या दोन्ही अंगांनी आज कठोर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे, हे अद्याप आपल्याकडील अनेक माध्यमांच्या लक्षात आलेले दिसत नाही. माध्यमविश्वाची स्वयंनियंत्रणाची यंत्रणा अस्तित्वात नाही आणि 'प्रेस कौन्सिल'ला कोणी भीक घालत नाहीत. शिवाय प्रेस कौन्सिल दंतहीन असून चुकीला शिक्षा करण्याचे अधिकार तिला नाहीत. वाहिन्यांची 'न्यूज ब्रॉडकास्टर्स असोसिएशन' असून तिची आचारसंहिता व स्वयंनियंत्रणाची यंत्रणा आहे, असे सांगितले जात असले, तरी तिचे अस्तित्व कुठे जाणवत नाही. असेल तर 'टीआरपी'ची व्यवस्था लावणे, जाहिरातीच्या वेळा एकमेकांशी विचार करून 'सिंक्रोनाइज' करणे, असल्या बाबतीत ती कार्यरत असते. नैतिक बंधने, आचारसंहिता याचे भान या असोसिएशनला नाही.

भारतातील 'मीडिया'ची विश्वासार्हता कमी झाली आहे. तो अधिकाधिक पक्षपाती होत चालला आहे. आता तर बहुतांश माध्यमांवर सरकारधार्जिण्या भांडवलदारांचे नियंत्रण आहे. जाहिरातदार, भांडवलदार ही आजच्या माध्यमांची दैवते. त्यामुळे 'पेज थ्री'संस्कृतीला उत्तेजन देणारी. सर्व जग भ्रष्टाचारात बरबटलेले आणि मीडियाचे अँकर-रिपोर्टर-मालक मात्र संतमहात्मे आहेत, असे समजून 'मीडिया ट्रायल' केली जाते. बातमी आणि वैयक्तिक मते यातील फरक तर अनेक माध्यमांनी केव्हाच पुसून टाकला आहे.

प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्याशिवाय लोकशाही निवडणूक हा विरोधाभास ठरेल. आपली भूमिका निभावण्यासाठी, माध्यमांना त्याच्या कव्हरेजमध्ये उच्च पातळीवरील व्यावसायिकता, अचूकता आणि निष्पक्षता राखणे आवश्यक आहे. कायदा आणि नियमन यांनी माहिती आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्य तसेच सहभागासह लोकशाहीसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत स्वातंत्र्यांची हमी दिली पाहिजे. निःपक्षपाती कव्हरेज आणि विरोधी पक्षांना समान महत्व देण्यासाठी सार्वजनिकरित्या निधी प्राप्त सरकारी माध्यमांची आवश्यकता आहे. याबाबत प्रसारमाध्यमांनी तटस्थ आणि सशक्त असणे अत्यंत आवश्यक आहे.

आजकाल

# दोन ऑक्टोबरच्या आठवणी..

**जगदीश नाईक**

१९९४ साली मी दक्षिण कोरियात होतो जवळ जवळ दिड वर्षे. सोल (दक्षिण कोरियाची राजधानी), ''योसु'' ह्या पार दक्षिण टोकाच्या एका शहरात आणि त्यानंतर उल्सान अशा तीन ठिकाणी हि दीडवर्षे गेली.

लग्नाचं ते आमचं सुरुवातीचं वर्ष होतं. कोरियात त्याकाळी बाहेरचे लोक फार कमी जायचे. आताही कदाचित थोडीफार तीच परिस्थिती असणार. कामानिमित्त गेले तेवढेच. त्याशिवाय बरेचसे अमेरिकन्स स्थानिक कोरियन स्थानिक कोरियन लोकांना इंग्रजी भाषा शिकवण्यासाठी जाऊन ४ ते ५ वर्षांसाठी राहायचे. अमेरिकन लष्कराचे तळ होते बऱ्याच ठिकाणी... त्यांच्याद्वारे येणारा इंग्रजीचा संबंध वगळता बाकी सगळा शुकशुकाट. सर्व मिळून इंग्रजी भाषा ५% हूनही कमी लोकांना येत असेल... मला आठवडाभर खूप असायचं. विकएंड हा एकमेव वेळ आम्हाला मिळायचा. त्यामुळे विकेण्डला लोनली प्लॅनेट च प्रवासाचं गाईड घ्यायचं आणि ट्रेक्स करायचे असा कार्यक्रम जवळ जवळ सहा महिने केला... अशाच एका वीकएंडला ''हेइन्सा टेम्पल'' ला ट्रेक करत गेलो. कोरियातली बौद्ध टेम्पल्स बहुधा उंचावर डोंगरात असतात. बाजूलाच वस्तीसाठी योकवान ''(छोटं राहण्याची व्यवस्था असलेले हॉटेल) होती. रविवारी देवळांच्या आवारात किंवा जवळपास फ्ली मार्केट्स भरायची. अशाच एका फ्ली मार्केटमध्ये आम्हाला ती कोरियन आजी भेटली... वय बहुधा सत्तर च्या पलीकडे असलेल्याला त्या आजीनी कॉफी चा स्टॉल मांडला होता... आम्ही तिच्या कडून हातवारे करून मोडक्या कोरियन भाषेत बोलत कॉफीचें घेऊन पैसे देऊन बाकड्यांवर बसून एकमेकांशी गप्पा मारत होतो. एवढ्यात तिचा प्रश्न आला ... ''यू, इंडो?'' आता इंडो म्हणजे कोरिअन्सच्या समजुतीत इंडोनेशिया देश होता. दक्षिण कोरिया आणि इंडोनेशिया देशांत खूप व्यापार होता त्यामुळे असेल ... तुम्ही इंडोनेशियन आहात का? असा तो प्रश्न होता..

''No, मी Not इंडो'' मी हातवाऱ्यांसकट म्हणालो.

शेवटी मी माझं वाक्य आणि उत्तर संपवलं. ''मी, इंडिया.''

ती अंतर्मुख झाल्यासारखी वाटली. मेमरी खूप ताणून विचार करत असल्याचे तिच्या चेहेऱ्यावर भाव होते. थोडा वेळ शांततेत गेला. मी अजून कॉफी ओतून घेतली. त्यानंतर काहीतरी लक्षात आल्याचे भाव तिच्या चेहऱ्यावर उमटले. चेहऱ्यावर मंद हास्य आले.

''यू, गांधी इन्डो?'' तिने प्रश्न केला.... आता थक्क व्हायची पाळी आमची होती !!.

मी ह्या उत्तराची, माहितीची स्वप्नांतसुद्धा कल्पना केली नव्हती...

कोरियातल्या अतिशय दुर्गम डोंगरातील ते मंदिर, तिथे फार स्थानिक वस्तीही नव्हती.

फार फार तर १०० ते दीडशे.

त्या आजीचं खूप काही शिक्षण वगैरे झालं असं वाटत नव्हतं. गरीब शेतकऱ्यांच्या घरातली आज्जी असावी ती.

त्या आजीला गांधी माहिती होते !! आम्ही प्रेमाने जमेल त्या मोडक्या संवादात तिच्याशी गप्पा मारल्या. आणि तिचा निरोप घेतला... ही ९४ ची गोष्ट आहे. म्हणजे आज जवळ जवळ ३० वर्षे लोटली. ती आजी हयात असण्याची शक्यताही मला अजिबात वाटत नाही... पण दर दोन ऑक्टोबरला मला हा प्रसंग आठवतो. आणि कोरियातले ते दिवसही आठवतात. कोरियन माणसं, माझी तिथली मित्रमंडळी खूप प्रेमळ होती. आमचं लग्न अर्जंड होत. सुरुवातीची एकमेकांबरोबर ची जुळणी आणि माझ्या लग्नाची सुरुवात अनोख्या देशात विलक्षण प्रेमळ मंडळीत गेली.. हा प्रसंग त्याची साक्ष म्हणून आज आठवतो.. त्यानंतर पुढे केलेल्या प्रवासात मेक्सिकोत मी गांधी मेमोरियल बघितले. मेक्सिको एअरपोर्टवर गांधी बुक स्टॉल ही आहे.. ती गांधी बुक स्टॉलची चेन १९७० च्या सुमारास लोकल मौरिसिओ आचार ह्या स्थानिक मेक्सिकन माणसाने स्थापली.. आइनस्टाइन, नेल्सन मंडेला, मार्टिन लुथर किंग ने केलेला गांधींचा उल्लेख बहुतांशी लोकांना माहिती आहे... पण त्याहून महत्वाची बाब अशी आहे की हेइन्झ पाजेल्स सारख्या क्वांटम मेकॅनिक्स मध्ये काम केलेल्या आणि त्या विषयाची ओळख करून देणाऱ्या अभ्यासकांच्या पुस्तकातही गांधींचा आदराने उल्लेख आहे...

अशीच कितीतरी उदाहरणे आहेत.. २००५-०७ च्या सुमारास माझा बराच काळ इंग्लंड मध्ये कस्टमर्स बरोबर जायचा. Mike Clinch हा माझा कस्टमर होता. त्याच्याशी चांगली मैत्री झाली होती. त्यांचा प्रोजेक्ट संपल्यावर मी त्याला गांधींचे ''माय स्टोरी'' हे पुस्तक भेट म्हणून दिलं होत.. त्यानंतर सुमारे ५ वर्षांनंतर आम्ही horsham येथे त्यांच्या ऑफिस मध्ये परत भेटलो. म्हणाला, हे पुस्तक वाचून झाल्यावर मला स्वतःला बदलावंस वाटलं.. मी गांधींविषयी ऐकलं होत पण हे वाचल्यानंतर अजूनही वाचत गेलो . मला स्वतःला बदलण्याचा जाणीवपूर्वक मी प्रयत्न करतो आहे.. गांधी खोलवर लोकांमध्ये गेलेत कुठपर्यंत गेले ही मला दिसलेली उदाहरणे. आपल्याच देशात गांधींचं आपण काय केलं, का केलं किंवा कायकरतो आहोत, आपल्या कायसमजुती आहेत ह्या विषयाबद्दल असे अस्वस्थ करणारे प्रश्न पूर्वी मला पडायचे.

ते आता कधीच पार मागे पडलेत... सगळा संदर्भ बदलत गेला हळू हळू..

शेवटी हे लक्षात ठेवावं लागतं की भारत/इंडिया हा देश आणि त्यातल्या माणसांचा समूह हा जगाच्या पाठीवरच्या २०० च्या आसपास देश, मनुष्य समूहांपैकी केवळ एक देश/समूह आहे..

**साभार**

लोकसंसद

## आता सीमेवर लष्करात रोबोटिक खेचर दाखल...

आजपर्यंत आपण अनेक ठिकाणी रोबोट काम करताना पहिले आहेत. विविध कंपन्या, हॉटेल्स यामध्ये असे रोबोट काम करतात. अमेरिकेसारख्या देशात तर शेतीसाठी सुद्धा त्याचा वापर करतात असे दिसते. आता शंभर रोबोट खेचर अर्थातच इंग्रजीत म्यूल आपल्या लष्करात दाखल झाले आहेत. हे रोबोट सुमारे तीन वर्षे कार्यरत राहातील. ते कोणतेही अडथळे पार करू शकतात. इतकेच काय पण नदीसुद्धा पार करू शकतात. त्यांच्यातील विशिष्ट तंत्रज्ञानामुळे ते वस्तू किंवा परिसर ओळखू शकतात ते डोंगर चढू शकतात व जिने चढउतार सुद्धा आरामात करू शकतात. उणे ४० अंश ते कमाल ५५ अंश तापमानात ते काम करू शकतात. शिवाय ते १५ किलो ओझे सुद्धा वाहू शकतात. ही माहिती एअरो आर्क चे मुख्याधिकारी अर्जुन अग्रवाल यांनी दिली आहे. ही खेचर सीमावर्ती भागात दाखल झाल्यामुळे सीमेवरील बंदोबस्त अधिक कडक करण्यात येईल. लेहमध्ये नुकतेच याचे प्रदर्शन करण्यात आले होते. ही बातमी नुकतीच वाचण्यात आली. या रोबोटच्या तंत्रामुळे आता माणसाचे काम सोपे झाले आहे. केरळ मध्ये तर शाळेत शिक्षिका या स्वरूपात रोबोट उत्तम काम करीत आहेत आता विविध कारखान्यात सुद्धा रोबोट काम करावयास सुरवात झाली आहे. एकूणच पुढील काही वर्षात हे तंत्रज्ञान सर्व क्षेत्रात पसरेल. अर्थात यामुळे मानवाचे काम कमी होईल. व कामात सुद्धा अचूकता येईल पण काही जणांना नोकरीचा सामना करावा लागेल ही एक विचार करण्यासारखी बाब आहे

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**४ ऑक्टोबर**

१८८६ :- मराठवाड्यातील कवी, चरित्रकार आणि सराफ कंधारद्धत ग्रंथमालेचे संस्थापक दत्तात्रय अनंत सराफ यांचा जन्म. 'श्री पूर्णानंद स्वामी संस्थान आदलाबाद','श्री समर्थ साधुषिरोमणी आणि तुकाराम महाराज येहलेगांवकर' आदींची चरित्रे त्यांनी लिहिलीत. याशिवाय 'धुम्रपान- निषेध पद्यावली' व 'दत्तकिंकरांती कविता भाग १' ही पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९११:-** छंदशास्त्राचे अभ्यासक, कवी नारायण गजानन जोशी यांचा जन्म. 'जीवनयोग' हे खंडकाव्य. 'विश्वमानव' हे दीर्घकाव्य, कविता अशी काव्यरचना त्यांनी केली असली तरी छंदशास्त्राचे अभ्यासक असा त्यांचा नावलौकिक आहे. 'मराठी छंदोरचना : लयदृष्ट्या पुर्नविचार', 'मराठी छंदोरचना विकास', 'तुलनात्मक छंदोरचना' हे त्यांचे लक्षणीय ग्रंथ, मर्मज्ञ व साक्षेपी काव्यचिकित्सक असाही त्यांचा लौकिक होता. ना.ग.जोशी गुजराथी भाषेचेही जाणकार होते. 'आमच्या बा' हा कस्तुरबा गांधीच्या गुजराथी चरित्राचा मराठी अनुवाद. **१९१४ :-** विविधांगी व्यासंग असलेले समीक्षक मधुकर वासुदेव धोंड यांचा जन्म. 'ज्ञानेश्वरीतील लौकिक सृष्टी', 'जाळ्यातील चंद्र' ही पुस्तके त्यांच्या व्युत्पन्नतेची साक्ष देतात. त्यांच्या 'चंद्र चर्वाथेचा' मध्ये 'एकच प्याला' या नाटकाची नव्या दृष्टिकोनातून समीक्षा आहे, तर 'तरीही येतो....' मध्ये बा. सी मर्ढेकर यांच्या कवितांचे नवे अन्वयार्थ आहेत. लावणीचा विकास आणि या वाङ्‌मयप्रकारचे मराठी काव्यातील स्थान याबद्दलच्या महत्त्वाच्या प्रस्तावना लेखासह 'मऱ्हाठी लावणी' हे त्यांनी केलेले एक महत्त्वाचे संपादनकार्य होय. याशिवाय ज्ञानेश्वरांच्या चिकित्सक विश्लेषणापासून मर्ढेकरांच्या कवितांची शोधापर्यत आपल्या विलक्षण समीक्षेसाठी ख्यातकिर्त असलेल्या म. वा धोंड यांनी आपल्या मर्मग्राही व धारदार लेखनाने गेल्या पाच सहा दशकात मराठी समीक्षा क्षेत्रावर स्वतंत्र ठसा उमटवला. **१९२५:-** लेखक विष्वासराव गणपतराव जोशी यांचा जन्म. 'भृषुंड गणेश' हा माहितीपर ग्रंथ त्यांच्या नावावर जमा आहे. **१९३७:-**साप्ताहिक स्वतंत्रचे कार्यकारी संपादक तसेच विविध वर्तमानपत्रे, नियतकालिके यातून आर्थिक, साप्ताहिक व राजकीय विषयांवरील लेखक सुधाकर विनायक जोषी यांचा जन्म. 'नावावर फुलते जीवन' या कादंबरीसह 'निखारे अजून विझले नाहीत' हा ग्रंथ अशी साहित्य संपदा. **१९४२:-** लेखिका पुष्पा देषमुख यांचा जन्म. 'बोन्साय' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह, 'गंधनाते' या काव्यसंग्रहातील त्यांच्या कविता म्हणजे अनेक गंध लहरींनी भरलेला एक अमृतघाट आहे. याशिवाय 'सारीपाठ' हा कथासंग्रह आणि 'उमका' ही महिलांवर घेतलेली कादंबरी अशी साहित्य संपदा. **१९४९:-** कवी छगनलाल फौजी पंचे यांचा जन्म. 'मंथन' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९५१:-** विनोदी लेखक पत्रकार मुकुंद मोरेष्वर टाकसाळे यांचा जन्म. लेखनाची सुरुवात मनोहर साप्ताहिकातून. 'मेलो ऽ मेलो ऽऽमेलोड्रामा' हे विडंबन नाट्य. 'टाकसाळीतील नाणी' हा विनोदी कथासंग्रह तर 'नाही मनोहर तरी' हा विनोदी लेखसंग्रह आणि 'स(द)र मिसळ' हा विविध नियतकालिकांतून लिहिलेल्या स्पुट लेखांचा संग्रह प्रसिध्द. खुसखुशीत, प्रसंगनिष्ठ व समकालीन वास्तवाषी सुसंवादी विनोदी लेखन हे त्यांचे वैशिष्ट्य. त्यामध्ये 'राधेने ओढला पाय','आणखी गंमतीजमतीत','सकाळी सकाळी', 'भटक बहाद्दर बोकोबा','बेगम गुलाबी आणि मावशी व तिचे कुत्रे' हे बालसाहित्य. **१९५९:-** विनोदी लेखक, वृत्तपत्रकार दत्तु तुकाराम बांदेकर यांचे निधन. 'चित्रा' मधील 'सख्याहरी' ह्या लेखमालेने त्यांनी खळबळ उडवून दिली होती. साप्ताहिक आणि वृत्तपत्रातून तीन दशके लेखन करणाऱ्या बांदेकरांच्या नावावर 'अतिप्रसंग','नवी आघाडी','चोर पावले' हे विनोदी लेखसंग्रह तसेच कथा - कादंबऱ्यांनी मराठी साहित्याचे दालन त्यांनी समृध्द केले आहे. **२०१३:-** लेखिका अनुराधा पोतदार यांचे निधन. काव्यसंग्रहासह काही संपादक लेख त्यांच्या नावावर आहे. २०१६:- प्रसिध्द लेखक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते भाई प्रभाकर विष्वनाथ सावरकर यांचे निधन.

**संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

४ ऑक्टोबर

१) कवी बंधू जगदीश
आंबेपूर, पोयनाड,
४/१०/१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**ला. श्री. भगवान मालपाणी, वाढदिवस, अलिबाग**

# मार्गातील अडथळा दूर होणार का?

## ■ रस्त्याची झाली चाळण, नागरिक त्रस्त

**। माथेरान । वार्ताहर ।**

**येथील मुख्य रस्त्याची दिवसेंदिवस चाळण होताना दिसत आहे. माथेरान रेल्वे स्थानकासमोरील ब्लॉक निखळून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. पर्यटकांना चालताना अनेक अडथळ्यांना सामोरे जावे लागत आहे. काही पर्यटकांच्या पायाला दुखापत झाली आहे. त्यामुळे या मार्गावरील अडथळे केव्हा दूर होणार? असा प्रश्न स्थानिकांसह पर्यटक सुद्धा विचारत आहेत.**



माथेरान या पर्यटनस्थळी पावसाळी पर्यटनात पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळाली. लाखो पर्यटकांनी भेट देऊन पावसाळी पर्यटनाचा मनमुराद आनंद घेतला. पण ही मजा घेत असताना माथेरानमध्ये प्रवेश करणाऱ्या महात्मा गांधी या मुख्य रस्त्यावर जागोजागी खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. एमएमआरडीएकडून तयार केला गेलेल्या रस्त्यावर मातीचे क्ले-पेव्हर ब्लॉक बसविण्यात आले आहेत. त्यापैकी काही पेव्हर ब्लॉक हे पूर्णपणे निखळले असून त्याजागी मोठ मोठे खड्डे पडले आहेत.पावसात या खड्ड्यात पावसाचे पाणी साचून राहायचे त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना या खड्ड्याचा अंदाज येत नसल्याने अनेकांच्या पायाला दुखापत पण झाली असून पहावे तिकडे खड्डेच दिसत आहेत. माथेरान नगरीत येणारा पर्यटक हा ५० रुपये प्रवासी कर भरून माथेरानमध्ये येतो तर त्याला सुरुवातीला या समस्येला सामोरे जावे लागत आहे.

या रस्त्यावर क्ले पेव्हर ब्लॉक असावे की नसावे यासाठी घोडेवाले आणि ई-रिक्षावाले यांच्यातील वाद हा सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याकारणाने या रस्त्याची डागडुजी होत नाही. या दोघांच्या भांडणात मात्र, येणाऱ्या पर्यटकांचे तसेच स्थानिकांचे अतोनात हाल होत आहेत. या घोडेवाले आणि ई-रिक्षावाले यांनी एकत्र येऊन सामोपचाराने हा मार्ग सोडविला पाहिजे, असे माथेरानमधील जाणकारांचे मत आहे. येथे शेती नाही उद्योग नाहीत, तर फक्त पर्यटनावर माथेरान अवलंबून आहे. असे असताना येथील पर्यटन कसे वाढेल याकडे अश्वपाल आणि ई- रिक्षा चालकांनी लक्ष दिले पाहिजे, असेही जाणकार सांगतात.

हा रस्ता सर्वांसाठी महत्वाचा आहे कारण याच रस्त्यावरून घोडेही चालत आहेत. रुग्णांना घेऊन याच मार्गावरून ई-रिक्षा धावतात. तसेच येथील सेंट्रल लॉर्ड हॉटेलच्या पुढे विद्यार्थ्यांना घेऊनही रिक्षा जात आहेत. त्यामुळे दोघांच्या वादात पर्यटक मात्र भरडला जात आहे.

> **“** आम्ही पन्नास रुपये कर भरून माथेरानमध्ये प्रवेश करतो. येताना क्ले-पेव्हर ब्लॉक रस्त्यावर चालताना मजा वाटते पण रेल्वे स्टेशन जवळ आलो की बुद्धिबळाच्या पटासारखे रस्ते दिसतात. एक ब्लॉक पूर्णावस्थेत तर एक ब्लॉक खड्डा असा दिसतो. याकडे प्रशासनाने विशेष लक्ष दिले पाहिजे. जर रस्ते चांगले असतील, तर आम्ही हे सुंदर पर्यटनस्थळ पाहू शकतो. पण रस्तेच नसतील तर फिरायचे कसे? **”**
> दिपनल शाह, पर्यटक, मुंबई

# एसटी बस सेवा सुरू

**। माणगाव । वार्ताहर ।**

किल्ले रायगडला जाण्यासाठी माणगाव ते किल्ले रायगड दैनंदिन एसटी बस सेवेचे स्वप्न पूर्ण झाले आहे. बस सेवेचे उद्घाटन गुरुवार दि.३ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता माणगाव बस स्थानक येथे करण्यात आले. आगार व्यवस्थापक छाया कोळी, वाहतूक नियंत्रक विनोद हाटे यांच्यासह प्रवासी उपस्थित होते. माणगाव ढाळघर फाटा, होडगाव, जांभूळवाडी, ताम्हाणे, पळसगाव, पुनाडेवाडी, पाचाड, किल्ले रायगड (रोपवे), असा या एसटी बसचा जाण्यायेण्याचा मार्ग असणार आहे. दररोज माणगाव वरून सकाळी ८:१० वाजता, दुपारी १: १५ व रात्री ७ :१० वाजता ही बस सुटणार असून किल्ले रायगड येथून सकाळी ९:२० वाजता, दुपारी २:२५ वाजता, सकाळी ५:४५ वाजता बस सुटणार आहे.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचित करण्यात येते की आम्ही आमचे अशिलांचे वतीने **श्री गुरुनाथ पांडुरंग माळी आणि श्रीमती दीपिका पांडुरंग माळी** यांचे शेती भूखंड, भूमापन क्रमांक ४३/२, क्षेत्र ३९ चौरस मीटर, मौजे वडवली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड (यापुढे ज्याचा एकत्रित उल्लेख सदरील मालपत्ता असा करण्यात येणार आहे) त्यामधील हक्क आणि हक्क संबंध तपासून पाहत आहोत.

**श्री गुरुनाथ पांडुरंग माळी आणि श्रीमती दीपिका गुरुनाथ माळी** यांनी कमल नागरी सहकारी पतसंस्था यांचे घेतलेले कर्ज रुपये १,००,००,००० /- (रुपये एक कोटी मात्र) वगळता अन्य कोणत्याही व्यक्तीचा सदरील मालमत्तेवर अथवा तिच्या कोणत्याही भागावर विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, असाइनमेंट, तारण, भार, भेट, ट्रस्ट, कोहिनंट, वारसा, दावा, लीज, सबलीज, परवाना, लीन, समभाग, भाडेपट्टा, पोट भाडेपट्टा, अनुदान, बिक्वेस्ट, उत्तराधिकार, व्यवसाय, इजमेंट, निवासाचा हक्क, कौटुंबिक करारनामा, कौटुंबिक तडजोड, देखभाल, डिव्हाइस, वस्तू विनिमय, कर्ज, तारण (इक्विटेबल किंवा अन्य) किंवा अन्य कोणत्याही माध्यमातून कोणत्याही स्वरूपाचा दावा, हरकत, हक्क हक्क संबंध, लाभ किंवा मागणी आदी असल्यास किंवा न्यायालयाच्या आदेशाच्या माध्यमातून, विकास हक्क भागीदारी किंवा अन्य कोणताही करारनामा आदींच्या माध्यमातून दावा किंवा हक्क असल्यास त्यांनी त्या संदर्भातील माहिती लेखी स्वरूपात आपल्या दाव्याच्या पुष्ठ्यर्थ आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित प्रतींसह निम्न स्वाक्षरीकार यांच्याकडे त्यांचे कार्यालय ८३- ८७, बी विंग, मित्तल टॉवर, आठवा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई येथे ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसात सादर करणे आवश्यक आहे अन्यथा असे समजण्यात येईल की श्री गुरुनाथ पांडुरंग माळी आणि श्रीमती दीपिका गुरुनाथ माळी हे सदरील मालमत्तेचे निर्वेध मालक आहेत आणि **श्री गुरुनाथ पांडुरंग माळी आणि श्रीमती दीपिका गुरुनाथ माळी** यांनी कमल नागरी सहकारी पतसंस्था यांचे घेतलेले कर्ज रुपये १,००,००,०००/-(रुपये एक कोटी मात्र) वगळता सदरील मालमत्तेवर कोणताही भार नाही आणि अशा कोणत्याही दाव्यांच्या अनुपस्थितीत हक्क संबंध तपासण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल आणि दावे असल्यास ते अधित्यजित आहेत, असे समजण्यात येईल आणि विहित कालावधीनंतर प्राप्त झालेल्या दाव्यांचा विचार करण्यात येणार नाही आणि ते आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत आणि प्रस्तावित व्यवहार अशा कोणत्याही दाव्यांच्या संदर्भाच्या शिवाय पूर्ण करण्यात येईल.

**सदरील मालमत्तेचे परिशिष्ट**

भूमापन क्रमांक ४३/२, क्षेत्र सुमारे ३९ चौरस मीटर, मौजे वडवली, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महानगरपालिका यांच्या हद्दीत या मालमत्तेचा पूर्ण तो भाग चतुसीमा पुढीलप्रमाणे

१ उत्तर दिशेला किंवा त्या बाजूनेः रस्ता आणि मालमत्ता सर्वे क्रमांक ४७

२ दक्षिण दिशेला किंवा त्या बाजूनेः सर्वे क्रमांक ४४

३ पूर्व दिशेला किंवा त्या बाजूने : रस्ता आणि मालमत्ता सर्वे क्रमांक ४३/४, ४३/३

४ पश्चिम दिशेला आणि त्या बाजूने : मालमत्ता सर्वे क्रमांक ४३/१

दिनांक : ४ ऑक्टोबर २०२४

**दुवा असोसिएट्स**
**एडवोकेट्स अँड सोलिसिटर्स**
८३-८७, बी विंग, मित्तल टॉवर, आठवा मजला, नरिमन पॉईंट मुंबई ४०० ०२१
ई-मेल:duamum@duaassociates.com

## स्वसंरक्षणासाठी महिलांना प्रशिक्षण

**। रसायनी । वार्ताहर ।**

युवती व महिलांसाठी मोफत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून महिलांना स्व:ताचे संरक्षण करता यावे म्हणून रसायनी पाताळगंगासह आसपासच्या परिसरातील मुली आणि महिलांसाठी लाठीकाठी, दांडपट्टा आदी मोफत प्रशिक्षण मोहोपाडा येथील श्री साई मंदिराच्या सभामंडपात दर रविवारी सुरु करण्यात आले आहे.

प्रत्येक रविवारी दुपारी १ ते २:३० वाजेपर्यंत प्रशिक्षण असणार आहे. युवती व महिलांना स्वसंरक्षणाबद्दल आत्मविश्वास वाढावा व आलेल्या प्रसंगाला सामोरे जाता यावे यासाठी हे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. यावेळी जनार्दन मालुसरे, प्रशांत तांबोळी, मलेश गुडसे, संदिप तांबोळी, राजेंद्र जांभूळकर, राजेंद्र चव्हाण, रविंद्र गायकवाड, निता व सूचिता जोशी, अदित्य सोमण आदी उपस्थित होते.

## पेणतर्फे तळे गावात महिलांनी राबविले ग्राम स्वच्छता अभियान

**। माणगाव । वार्ताहर ।**

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीचे औचित्य साधून बुधवार २ ऑक्टोबर २०२४ रोजी पेणतर्फे तळे गावात ग्रामविकास समिती व ग्रीन फाऊंडेशन यांच्यावतीने आयोजित या स्वच्छता अभियानात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. गावातील रस्ते, गल्लीबोळ व सार्वजनिक ठिकाणे पानवटे, विहिरी यांची यावेळी स्वच्छता करण्यात आली.

प्लास्टिक कचरा, बॉटल्स, अनावश्यक झाडी झुडपे यांची स्वच्छता करून प्लास्टिक कचऱ्याचे संकलन करून ग्रीन कम्युनिटी फाऊंडेशनकडे सदर प्लास्टिक कचरा पुनर्वापरासाठी देण्यात आला. ग्रीन कम्युनिटीचे मनोहर पाटील, समन्वयक गणेश वडेकर, वाहन चालक साईनाथ पेणकर, सहकारी रामदास वडेकर, तसेच ग्रामस्थ मंडळ, माजी सरपंच, ग्रामपदाधिकारी व परिसरातील महिलांचे सहकार्य लाभले. महिलांनी ग्राम स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवून ग्राम स्वच्छ व सुंदर केल्याबद्दल ग्रामस्थांनी सर्वांचे आभार मानून महिलांचे कौतुक केले. अत्यंत उत्साह पूर्ण वातावरणामध्ये पेणतर्फ तळे गावामध्ये ग्राम स्वच्छता अभियान रबविण्यात आले.

## काशीद बीचवर स्वच्छता मोहीम

**मुरूड जंजिरा** : महात्मा गांधी जयंती आणि लाल बहादूर जयंती निमित्त ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत मुरूड तालुक्यातील काशीद बीचवर स्वच्छता मोहीम यशस्वी करण्यात आली. बिचवरील पालापाचोळा, कचरा, प्लास्टिक बाटल्या आदी विविध प्रकाराचा सुमारे एक टन कचरा गोळा करून विल्हेवाट लावण्यात येऊन बीच स्वच्छ करण्यात आल्याचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत जंगम यांनी सांगितले.

सदर मोहीम यशस्वी होण्यासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता ग्रुप ग्रामपंचायत काशीदने पुढाकार घेतला. माध्यमिक विद्यालय, सर्व शाळा, अंगणवाडी कर्मचारी, विध्यार्थी, पंचायत सदस्य, स्थानिक पदाधिकारी ग्रामस्थ उपस्थित होते.

## संस्कृतीने पटकावला प्रथम क्रमांक

**। माणगाव । वार्ताहर ।**

छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळा अनावरण सोहळ्यानिमित्त आयोजित वक्तृत्व स्पर्धेत इयत्ता आठवी ते दहावी मोठ्यागटात छत्रपती शिक्षण मंडळ कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी संस्कृती ऐत ( इयत्ता नववी ) हिने प्रथम क्रमांक पटकाविला आहे.



सोमवार ३० ऑक्टोबर माणगाव येथील जावळी हायस्कूलमध्ये संपन्न झालेल्या स्पर्धेमध्ये संस्कृतीने हे यश संपादन केले आहे. रोहा या ठिकाणी होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यानिमित्त या स्पर्धा घेण्यात आल्या. अत्यंत उत्साहाने या स्पर्धेमध्ये तालुक्यातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत संस्कृतीने दमदार भाषण दिले. विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र, सन्मान चिन्ह तसेच रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. माणगाव तालुक्यातील राजकीय पुढारी, प्रतिष्ठीत नागरिक, ग्रामस्थ, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी या मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण करण्यात आले. माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचे शाळा समिती अध्यक्ष संजय पालकर, संस्था पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष कदम सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

# १२ वी पास विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीची योजना

**। म्हसळा । वार्ताहर ।**

रॉनी स्क्रूवाला व झरीना स्क्रूवाला यांच्या स्वदेस फाऊंडेशनच्यावतीने रायगड जिल्ह्यामधील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर व सुधागड या तालुक्यामध्ये ग्रामीण सक्षमीकरणाचे प्रकल्प गाव विकास समितीच्या सहकार्यांमधून राबवित आहेत. स्वदेस शिष्यवृत्ती योजना हा या उपक्रमाचाच एक भाग आहे. गेल्या अनेक शैक्षणिक वर्षांमध्ये स्वदेसच्या मदतीने ५५४ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देऊन त्यांची उच्च शिक्षणाची स्वप्न पूर्ण करण्यासाठी मदत केली. गरीब आणि होतकरू विद्यार्थी आहेत त्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वदेसने केले आहे.

विद्यार्थी हा रायगड जिल्ह्यातील माणगाव, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर व सुधागड या तालुक्यातील रहिवासी असावा, कुटुंबाचे वार्षिक आर्थिक उत्पन्न ८.५ लाख रुपयांच्या आत असावे, १२ वी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेत ६०% पेक्षा जास्त टक्केवारी असावी, विद्यार्थ्याची उच्च शिक्षण घेण्याची महत्वकांक्षा असावी.

शिष्यवृत्ती निवड प्रक्रिया-विद्यार्थ्यांने अर्ज हा ऑनलाइन पद्धतीने स्वदेस फाऊंडेशनने दिलेल्या क्यूआरकोड स्कॅन करून आपली माहिती भरून २५ ऑक्टोबर २०२४ पूर्वी पाठवावी. त्यानंतर स्वदेसतर्फे विद्यार्थ्याच्या दोन मुलाखती घेतल्या जातील. मुलाखतीत पास झालेल्या विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली जाईल.

विद्यार्थ्याचे उच्चशिक्षण पूर्ण होईपर्यंत शिष्यवृत्ती दिली जाईल. प्रत्येक वर्षी दोन हप्त्यांमध्ये ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्याला दिली जाईल. शिष्यवृत्ती रक्कम ही विद्यार्थ्याच्या बँक खात्यात जमा केली जाईल. शिष्यवृत्तीची रक्कम ही विद्यार्थ्याच्या कुटुंबाच्या वार्षिक उत्पनानुसार दिली जाईल. ज्यामध्ये विद्यार्थ्याच्या कॉलेज फी आणि वसतिगृह खर्चाचा समावेश केला जाईल.

उच्चशिक्षणासाठी शिष्यवृत्तीची योजना

वैद्यकीय क्षेत्र - बीएएमएस, एमबीबीएस, बीडीएस, नर्सिंग, फार्मसी इ.

वाणिज्य क्षेत्र-सीए, सीएस, बीकॉम इन अकाउंटन्सी, अभियांत्रिकी क्षेत्र-पदवी पदविका व आर्किटेक्चर

कायदा क्षेत्र -एलएलबी, हॉटेल मॅनेजमेंट, फॅशन डिझायनर. उच्च शिक्षण घेण्यासाठी पात्रता परीक्षा, स्पर्धात्मक परीक्षा, एमपीएससी, यूपीएससी,सैन्यदल व पोलीस पात्रता परीक्षा यासाठी सुद्धा शिष्यवृत्ती देण्यात येते, असे स्वदेसने स्पष्ट केले आहे.

## फडके विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षाची यशस्वी सांगता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रएज्युकेशनसोसायटी संचालित आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयाने आपल्या रौप्य महोत्सवी वर्षपूर्ती निमित्त एका विशेष समारंभातचे आयोजन केले होते. या समारंभाला प्रसिद्ध उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते गिरीश समुद्र, म.ए.सो. नियामक मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब शिंदे, शाळा समिती अध्यक्ष देवदत्त भिशीकर, सुधीर गाडे यांच्यासह संस्थेचे पुणे येथील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी समारंभात चिंचवली येथील वनवासी कल्याण आश्रमातील मुलांकरीता विद्यार्थ्यांनी जमा केलेले १२०० किलो तांदूळ भेट म्हणून सुपूर्त करण्यात आले. रौप्य महोत्सवीवर्षानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल जि. रायगड -४१०२०६**
दुरध्वनी कार्यालय ०२२ २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२-२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२ - २७४५५७५१
ई-मेल: panvelcorportation@gmail.com वेबसाईट:www.panvelcorporation.com

जा.क्र/माव्य./९९२४/प्र.क्र.४०/४८३/२०२४ दिनांक : ०३/१०/२०२४

**जाहीर सूचना**

कामाचे नाव :- पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वडाळे तलाव येथे पनवेल महानगरपालिका आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम साजरा करणेकरीता प्रायोजकत्वासाठी प्रस्ताव मागविणेबाबत.

सन २०२४ मधील पनवेल महानगरपालिका क्षेत्रामध्ये पनवेल महानगरपालिका दिवाळी पहाट कार्यक्रमाचे आयोजन करीत आहेत. सदर कार्यक्रम साजरा करणेकामी महानरपालिकेमार्फत प्रायोजकत्वासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदरचे प्रस्ताव कार्यालयीन वेळेत दिनांक १०/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानरपालिका मालमत्ता विभागात सादर करावीत.

सदर प्रस्तावामध्ये कार्यक्रमाची रुपरेषा, अंदाजित सहभागी संख्या, अंदाजित येणारा खर्च इत्यादी बाबींचा समावेश असावा. उत्कृष्ट प्रस्ताव सादर करण्याऱ्या संस्थेस मुख्य प्रायोजकत्व बहाल करण्यात येईल. याबाबत अंतिम निर्णय मा. आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका यांना राहतील याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**उपायुक्त (मालमत्ता)**
**पनवेल महानगरपालिका**

## विद्यार्थ्यांना सायबर मार्गदर्शन

**। मुरूड जंजिरा । वार्ताहर ।**

मुरुड तालुक्यातील उसरोली येथील अंशू फाऊंडेशनच्यावतीने सायबर क्राईम संदर्भात नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या जागृतीसाठी सोमवारी मार्गदर्शन करण्यात आले. अंशु फाऊंडेशनचे कार्यक्रम प्रमुख निलेश दिलीप गुंड यांनी सध्याच्या काळात सर्वत्र वाढत चाललेल्या सायबर गुन्हेगारी संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संगणकाचे शिक्षण घेताना त्यांना इंटरनेटच्या जगात घ्यावयाच्या जबाबदारी आणि खबरदारीबाबत जाणीव करून दिली. विद्यार्थ्यांनी कोणतीही ऑनलाईन आव्हाने स्वीकारू नयेत, विविध खेळातील इतर खेळाडूंकडून कोणतीही ऑफर स्वीकारु नये, त्यांच्या दबावाखाली येऊ नये, अनोळखी व्यक्तीशी कोणताही खेळ खेळू नका, व्यवहार करताना सावधानता बाळगा तसेच धमक्या आल्यास पालकांना व पोलिसांना सांगा, असे आवाहन केले. कॉम्प्युटर इंजिनिअर स्वाती घाग यांनीही यावेळी मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अर्चना खोत, शिक्षक प्रतिनिधी योगेश पाटील, एस.एस. करडे आदी यावेळी उपस्थित होते.

## सेवा आठवडा निमित्त कार्यक्रम

**। पनवेल । वार्ताहर ।**

लायन्स क्लब ऑफ मुंबई मिडटाउन लायन्स क्लब्स इंटरनॅशनल जिल्हा ३२३१-ए १ या संघटनेच्यावतीने मासिक सर्वसाधारण सभा राष्ट्रीय मिल मजदुर संघ, परेल येथे पार पडली. लायन डॉ. जगन्नाथराव हेगडे हे अध्यक्ष होते. सदर सभेत पदाधिकारी व सदस्य यांना ऑक्टोबर सेवा सप्ताहाचे कार्यक्रम, दादर येथे होणारे रक्तदान शिबिर, एसआरसीसी रुग्णालय हाजीअली येथे पोलिओ, अवयवदान व किडनी उपचार शिबिर, वामनराव महाडिक उद्यान येथे वृक्षारोपण, केईएम रुग्णालय व संत गाडगे महाराज वृध्दाश्रम दादर येथे अन्नदान व या सेवा सप्ताहात होणाऱ्या इतर कार्यक्रमाच्या सूचना व संघटना वाढी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

त्याप्रसंगी अनुराधा हेगडे, सचिव विजय रायमाने, खजिनदार विलास डांगे, फर्स्ट व्हॉइस प्रेसिडेंट जितेंद्र दगडू(दादा) सकपाळ, गोविंदराव मोहित यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

## पत्रकार दिपक पाटील यांना पुरस्कार जाहीर

**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील पत्रकार दिपक पाटील यांना माणगांव तालुका पत्रकार संघाचा सन २०२४ चा पत्रकार भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

शनिवारी दुपारी ३ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार दिपक पाटील यांना प्रदान करण्यात येणार असल्याचे संघाचे अध्यक्ष सलिम शेख यांनी सांगितले.

## देवकान्हे मार्गावर काटेरी झुडपे

**कोलाड** : मुंबई-गोवा महामार्गालगत जोडला गेलेला उप रस्ता म्हणजे खांब देवकान्हे पालदाड तसेच हा मार्ग अनेक गावांना जोडला गेला असून या मार्गावरुन सातत्याने वाहनांची वर्दळ असते. या मार्गावर गेली अनेक वर्ष मोठ मोठे जीव घेणे खड्डे पडले होते. या मार्गाच्या कामाला लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर अधिक भर देत नव्याने दुरूस्ती करत त्याचे डांबरीकरण करण्यात आले. मात्र अरुंद मार्ग त्यात भयानक वळणे असल्याने त्यात काटेरी झुडपे खूप मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत.

# लाल बहादूर शास्त्री, महात्मा गांधी जयंती साजरी



**। आगरदांडा । वार्ताहर ।**

मुरुड जंजिरा नगरपरिषद कार्यालयात देशाचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त प्रतिमेला रचना सहाय्यक अनिकेत भोसले तर महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला सहाय्यक कर निरीक्षक नदंकुमार आबंतेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी सचिन कोरके, रिया बांद्रे, दिपक शिंदे, जयेश चोडणेकर यांनी फुलांचा वर्षाव करुन अभिवादन केले. ब्रिटिशांविरुद्ध महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली अनेकांनी प्रेरणा घेतली, तशी प्रेरणा घेत लाल बहादूर शास्त्री यांनीही स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला झोकून दिले, असे मान्यवरांनी सांगितले.

**महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण मुंबई**

**कार्यालय : -**
जुने सचिवालय २ रा मजला, फोर्ट, मुंबई ३२,
दुरध्वनी क्रमांक ०२२-२२८४४६३४
**Email: registrarmrt@yahoo.in**

क्र. अध्यक्ष/TNC/Rev/Rag/L-५६/२०२४ दिनांक : २३/०९/२०२४

**प्रति,**
कै. मरीयम बी सरदारमिया मुजावर तर्फे वारस
श्री. हुसेन सरदारमिया मुजावर
रा. खानावले, ता. पनवेल, जि. रायगड **......अर्जदार**

**विरूध्द**

**१. श्रीपाद लक्ष्मीनारायण भट**
**रा.पळस्पे, ता. पनवेल, जि. रायगड**

**विषय : सुनावणी नोटीसीबाबत.**

वरील नांव धारण करणारा, अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी, पनवेल यांचेकडील टेनन्सी/अपिल/क्र.२२७/२०२२ दि.२७/०७/२०२२ च्या आदेशाबाबत केलेल्या उपरनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी **दिनांक १८/११/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता** न्यायाधिकरणापुढे खालील पत्त्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर हे न्यायाधिकरण सदरहु अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश देईल.

**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, मुंबई**

**सुनावणीचे ठिकाण :- महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई, यांचे कार्यालय, जुने सचिवालय विस्तार इमारत, २ रा मजला, फोर्ट, मुंबई - ३२**

**KMC**

**खोपोली नगरपरिषद**
**खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड, पीनकोड नं ४१० २०३.**
**फोन नं. (०२१९२) २६२२२२, २६३३५६, २६४२११**

**जा.क्र. केएमसी/बांधकाम/** **दिनांक:- / /२०२४**

वाचा:- मा. मुख्याधिकारी, खोपोली नगरपरिषद, खोपोली जि.रायगड यांच्याकडील खोपोली नगरपरिषद जा.क्र. केएमसी/जीईए/इएसटी/४५६ खोपोली नगरपरिषद कार्यालय दि. १९/०७/२०२४ रोजीच्या आदेशानुसार बांधकाम विभाग

**निविदा सुचना क्र.१७**

खोपोली नगरपरिषद, खोपोली जि.रायगड यांजकडून खालील कामांसाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागात योग्य त्या वर्गात नोंदविलेल्या अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून ब-१ नमुन्यातील द्विनोंद लिफाफा पध्दतीने सिलबंद फेर निविदा मागविणेंत येत आहेत.

| अ.क्र | कामाचे नांव | निविदा फॉर्म फी | निविदे सोबत भरावयाची अनामत रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | अ) खोपोली नगरपरिषद हद्दीतील खोपोली नगरपरिषद मालकीच्या इमारती जुन्या व जिर्ण झालेल्या वरची खोपोली येथील सी.टी.सर्व्हे नं. ४५७८ मधील जुना बस डेपो क्वार्टर्स इमारत पाडणे बाबत (फेर निविदा)<br>ब) खोपोली नगरपरिषद पार्किंग शेजारील एस.टी. स्थानक इमारत पाडणे बाबत. (फेर निविदा) | १०००/- | २५०००/- |

**कामाच्या अटी व शर्ती:-**

निविदा फॉर्मची विक्री कार्यालयीन वेळेत दि. ०४/१०/२०२४ ते ११/१०/२०२४ पर्यंत सकाळी १०.३० ते सायं ५.३० वा. पर्यंत राहील. मात्र या करिता निविदा फॉर्म फी नागरी सुविधा केंद्रात जमा केल्यानंतर बांधकाम विभागातून फॉर्म उपलब्ध करून मिळेल.

सविस्तर कामासंबधी अतिरिक्त माहिती खोपोली नगरपरिषद बांधकाम विभागात कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस खेरीज) मिळू शकेल .

**सही/-**
**नगरअभियंता**
**खोपोली नगरपरिषद**

# पोलादपूरमध्ये माकडांचा सुळसुळाट

## निर्बिजीकरण करण्याची मागणी

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

**पोलादपूर नगरपंचायत हद्दीमध्ये निर्बिजीकरण झालेल्या कुत्र्यांपासून नागरिकांची सुटका झाली असली तरी सध्या सुमारे हजारहून अधिक माकडांचा सुळसुळाट सुरू आहे. माकडांच्या संख्येत कमालीची वाढ होत असून शाळा व बाजारपेठेकडे जाणाऱ्या महिला व विद्यार्थ्यांना या माकडांपासून खजिल व्हावे लागत आहे. परिणामी, येत्या काळामध्ये माकडांची संख्या आणखी झपाट्याने वाढणार असून माकडांचे निर्बिजीकरण करण्यासाठी पोलादपूर नगरपंचायत व वनविभागाने संयुक्त उपक्रम राबवून शहरातील नागरिकांना दिलासा देण्याची गरज व्यक्त होत आहे.**



पोलादपूर तालुक्यात २५ वर्षांपूर्वी गावडुक्करांनी हैदोस घातला होता. यानंतर पोलादपूर ग्रामपंचायतीने या गावडुक्करांना पकडून पोलादपूरपासून दूर नेऊन सोडण्याची मोहिम राबविली होती. यानंतर मोकाट कुत्र्यांची संख्या वाढली. २०१८ मध्ये एका पिसाळलेल्या कुत्र्याने पोलादपूर शहरामध्ये अनेकांना चावे घेतल्यानंतर कुत्रे घातक वाटू लागले होते. यानंतर पोलादपूर नगरपंचायतीने कोल्हापूर येथील सोसायटी ऑफ ॲनिमल प्रोटेक्शन संस्थेच्या सहकाऱ्यांमार्फत स्व. बाळासाहेब ठाकरे सभागृहात निर्बिजीकरणाची मोहिम राबविण्यात आली होती. यामुळे पोलादपूर शहरातील मोकाट कुत्र्यांची संख्या नियंत्रणात येऊन कुत्र्यांच्या आक्रमकतेलादेखील पायबंद बसून श्वानदंश टळले आहेत. परंतु, आता माकडाच्या हैदोसाने येथील नागरिक त्रस्त झालेले आहेत.

यंदाच्या पावसाळ्यात अनेक मादी माकडे आपल्या छातीला कवटाळून पिल्लं घेऊन वावरताना दिसत आहेत. या माकडांचे मोठंमोठे कळप येथील श्रीकाळभैरवनाथ मंदिर, पोलादपूर तहसिल व नगरपंचायत कार्यालय, आनंदनगर, गाडीतळ, भैरवनाथनगर, सिध्देश्वरआळी, जुने पोलीस ठाणे आणि महाबळेश्वर रोडवरील भाजी व फळांची दुकाने या परिसरांमध्ये वावरत असल्याने या भागांतील नागरिक खुपच त्रस्त झालेले आहेत. नुकतेच काटेतळी गावामध्ये एका माकडाने पाच-सहा जणांना कडकडून चावे घेतल्यानंतर पोलादपूर शहरामध्ये या माकडाने प्रवेश करून बाजारपेठेमध्ये व्यापारी, पादचारी आणि महिलांना त्रास देण्यास सुरूवात केली होती.

दरम्यान, दुकानदार सचिन बुटाला आणि पेपरविक्रेते दिलीप साबळे यांना या माकडाने चावे घेतल्याने त्यांनी तातडीने डॉक्टरांकडून रेबिजची इंजक्शन्स घेतली. मात्र, तेव्हा चावणारे माकड जेरबंद करण्यात यशस्वी झाले होते. परंतु, वन विभागाच्या अधिकाऱ्यांना व नगरपंचायतीला माकडांपासून नागरिकांची कायमस्वरूपी सुटका करण्याची इच्छा दिसत नसल्याने अद्याप अनेक घरांचे काँक्रीटचे पत्रे तसेच वायफाय केबल, केबल, विद्युतमीटरपर्यंत जाणारी सर्व्हिस केबल, खिडक्यांची तावदाने यांचे माकडांच्या उद्रेकामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

# कोलाडमध्ये विविध कार्यक्रम




**। कोलाड । वार्ताहर ।**

जागतिक जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (दि.१) कोलाड येथील संपूर्ण आंबेवाडी बाजारपेठेतुन रॅली काढण्यात आली. यावेळी कोलाड पोलिस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते यांनी जेष्ठ नागरिकांना आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले की, तुम्ही उद्याची पिढी घडवत आहात. यामुळे मला तुमचा अभिमान आहे.

मुंबई-गोवा महामार्गाचे काम वेगाने सुरु असुन हा रस्ता जागोजागी खोदून ठेवला आहे. यामुळे तुम्ही घराबाहेर पडू नका. तुमच्या कोणतेही अन्याय झाले किंवा संकट आले तर तुम्ही मला फोन करा, मी तुमच्यासाठी हजर असेन, असे सांगण्यात आले. तसेच डॉ. मंगेश सानप यांनी जेष्ठ नागरिक यांना मार्गदर्शन करतांना सांगितले की, तुमच्या संस्कारामुळे आम्ही घडलो आहोत. शेती करणे हा आपला मुख्य व्यवसाय असुन आता शेती ही काळबाह्य होत आहे. यामुळे तुमच्या सारखी पिढी पुन्हा होणे नाही. येणाऱ्या काळात आपली काळजी घ्या व आनंदात जगण्याचे सानप यांनी सांगीतले.

यावेळी कोलाड पोलीस ठाण्याचे सपोनि नितीन मोहिते, अंमलदार नरेश पाटील, डॉ. मंगेश सानप, रविंद्र लोखंडे, डॉ. श्यामभाऊ लोखंडे, विश्वास निकम, नंदकुमार कळमकर, राजेंद्र कप्पू, डॉ.विनोद गांधी, विठ्ठल सावळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. जेष्ठ नागरिक मंडळाचे अध्यक्ष मारुती राऊत यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

# विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ऑक्टोबर सेवा सप्ताहनिमित्त लायन्स क्लब मांडवाच्यावतीने अध्यक्ष जितेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.१) रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सारळ, धोकवडे, सोगाव येथील २६० विद्यार्थ्यांना डेस्किट स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले.




लायन्स क्लब मांडवा यांच्यावतीने ऑक्टोबर सेवा सप्ताहाचे विविध उपक्रम सुरु झाले आहेत. त्याचा एक भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांना डेस्किट स्कूल बॅगचे वाटप करण्यात आले. या डेस्किटचे प्रायोजक अमित नाईक, विद्या अधिकारी, सुधीर पुरो, अमरेश शिरगावकर, हर्षद पाटील, उज्ज्वला पाटील, डॉ. शुभदा कुडतलकर, धवल राऊत हे होते. या उपक्रमासाठी लायन्स हेल्थ फाऊंडेशनचे उपाध्यक्ष नितीन अधिकारी, लायन्स क्लब मांडवाचे अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, प्रदीप पाटील, अमिश शिरगावकर, अभिजित गुरव, चंद्रकांत मल्हार, हर्षद पाटील, मोहन पाटील, अजय आंगणे, आमरेश शिरगावकर, विद्या अधिकारी, जितेश्री ठाकूर, सारिका पाटील, स्मितल शिरगावकर, सुमित पाटील आदी लायन्स सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

# आदिवासी मुलांना कपड्यांचे वाटप

**। अलिबाग । वार्ताहर ।**

लायन्स क्लब अलिबागतर्फे गांधी जयंतीचे औचित्य साधून आक्टोबर सेवा सप्ताहाच्या निशित्ताने सागाव आदिवासीवाडीतील गरीब आणि गरजू मुलांना कपड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी साधारण पन्नासहून अधिक मुलांना उत्तम प्रतिचे टीशर्ट आणि पँटचे वाटप लायन पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले.

यावेळी मुलांच्या चेहऱ्यावरील समाधानाचे हसू हीच लायन्स अलिबागच्या माध्यमातून करीत असलेल्या सेवेची पोचपावती असल्याचे उपस्थितांनी बोलून दाखवले. यावेळी प्रशुख उपस्थितांमध्ये अलिबाग लायन्सच्या अध्यक्ष ॲड. गौरी म्हात्रे, महेश कवळे, अंकिता म्हात्रे, गिरीश म्हात्रे, नितीन शेडगे, रमेश धनावडे, अभिजित आमले, प्रकाश देशमुख, परेश भतेजा, संजय मोरणकर, मनोज ढगे, अतुल कुलकर्णी, कल्पेश थळे यांसह लहान मुले, मुली आणि त्यांचे पालक उपस्थित होते.



## पिरवाडी समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने उरण पिरवाडी समुद्रकिनारा स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली होती. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी समुद्रकिनाऱ्यावरील संपूर्ण स्वच्छता करत महात्मा गांधी यांना अभिवादन केले. के. शामा यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या उपक्रमात वीर वाजेकर महाविद्यालयातील एनएसएस प्रमुख दिंधले यांनी प्रास्ताविकात गांधीजींच्या जीवनातील स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांसमोर विशद केले. गोसावी यांनी महात्मा गांधीजींच्या जीवनातून आपण सर्वांनी आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन केले.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत नागरपरिषदेकडून स्वच्छता पंधरवडा राबविण्यात आला. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या स्वच्छता कर्मचारी यांचा पालिकेच्यावतीने स्वच्छता पंधरवडा समारोपाच्या कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

कर्जत नगरपरिषदेने १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत स्वच्छता पंधरवडा साजरा केला. या कालावधीत स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत कर्जत नगरपरिषद परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छतेचे पुरस्कर्ते महात्मा गांधी यांची जयंती आणि स्वच्छता ही सेवा या स्वच्छता पंधरवडाचे समारोप कार्यक्रमाचे आयोजन पालिका कार्यालयात करण्यात आले होते. कर्जत नगरपरिषद कडून शहरातील सर्व भागात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली आणि या मोहिमेत महत्वाची भूमिका बजावणारे स्वच्छता कर्मी यांचा सन्मान पालिकेच्या आरोग्य आणि स्वच्छता विभागाच्यावतीने करण्यात आला.

# नागाव ग्रामपंचायतीच्यावतीने ज्येष्ठांचा सन्मान

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

नागाव ग्रामपंचायत, जेष्ठ नागरिक संस्था नागाव व सरपंच हर्षदा मयेकर यांच्या पुढाकाराने नागावमध्ये जेष्ठ नागरिक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचक आयोजन नागाव ग्रामपंचायतीच्या सभागृहात करण्यात आले होते. या कार्यक्रमाला नागाव ग्रामपंचायत हद्दीतील ३५० जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच हस्ते दिपप्रज्वलन तसेच इशस्तवन गायनाने करण्यात आली. यावेळी जेष्ठ नागरिक संघाच्यावतीने उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ प्रदान करून करण्यात आले. यानंतर उपस्थित जेष्ठ नागरिकांचा सत्कार उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी अनेक जेष्ठांनी मार्गदर्शनपर भाषण केले. यावेळी, नागाव मधील ३५० जेष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपिठावर नागाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नंदु मयेकर, माजी सरपंच व विद्यमान सदस्य निखिल मयेकर, नागाव जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अनंत जोशी, सरपंच हर्षदा मयेकर, ग्रामपंचायत अधिकारी स्वेता कदम, सर्व सदस्य व ग्रामपंचायत कर्मचारीवर्ग उपस्थित होते.






● उरण तालुक्यातील डाऊन नगर देवी पूजक समाज



● नवरात्र निमित्त रायगड जिल्हा परिषद येथील डीआरडी आणि एमएसआरएलएमच्या महिला कर्मचाऱ्यांनी पिवळ्या रंगांच्या साड्या परिधान केल्या होत्या.




● उरण तालुक्यातील आनंदनगर श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघातील देवीची सुबक मुर्ती.

# विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

**गडब :** पेण तालुक्यातील गडब गावातील १९९८ दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा पाबळ येथे मोठ्या उत्साहात पार पडला. २४ वर्षांनंतर वेगवेगळ्या क्षेत्रातील मित्रमैत्रिणी एकत्र येऊन हा स्नेहमेळावा साजरा करत जनता हायस्कूलच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला. अलीकडे व्हॉटसअपमुळे गमावलेली, दुरावलेली नाती एकत्र येत आहेत. याच सोशल मिडियाच्या माध्यमातून दहावीचे विद्यार्थी एकत्र आले. या दहावी बॅचच्या स्नेहमेळाव्याच्या यशस्वी नियोजनासाठी भगवान पाटील, जितू पाटील, प्रमिला पाटील, आशा पाटील, नागेश पाटील, प्रीतम केणी यांनी प्रयत्न केले होते.

# विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

**। उरण । वार्ताहर ।**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने नागरी संरक्षण दल यांच्या सहकार्याने महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी पाच दिवसाचे नागरी संरक्षण प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले.

के. ए. शामा यांच्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षित व सक्षम बनविण्याच्या उद्देशाने या शिबिराचे आयोजन केले गेले. यावेळी, शशिकांत सिरसाठ व हरेश्वर ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना आपत्तीचे प्रकार, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, आपत्तीच्या प्रसंगी घ्यावयाची काळजी व आपली जबाबदारी इत्यादी विषयी मार्गदर्शन केले. तसेच, दोरीच्या विविध गाठी व त्याचे उपयोग, आपत्कालीन परिस्थितीत विमोचन करण्याच्या पद्धती, कृत्रिम शोषण पद्धती, आपातकाळात स्वसंरक्षण इत्यादी विषयी प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन केले.

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन साजरा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून अलिबाग ज्येष्ठ नागरिक संस्थेने मंगळवारी (दि.१) संस्थेच्या सभागृहात 'ज्येष्ठ नागरिकांचे अधिकार व कर्तव्य' या विषयावर लायन्स क्लब श्रीबाग सेंटिअलचे अध्यक्ष ॲड. के.डी. पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ॲड. के.डी. पाटील यांनी आपल्या व्याख्यानात ज्येष्ठ नागरिकांना आपल्यामागे शासन व न्यायालयही ठामपणे उभे असून त्यांनी ज्येष्ठांच्या सुरक्षिततेसाठी व त्यांना सन्मानाने जगता यावे, यासाठी विविध कायदे केले असून त्यांचा फायदा त्यांना उतार वयात येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी होत आहे, असे सांगून ज्येष्ठांनीही आपले कर्तव्य कसे पार पाडावे, आपल्या कुटुंबात व समाजात आपल्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा कसा करून द्यावा याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारीवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

● नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. कॉंटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सॲपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.

● 'इंद्रप्रस्थ' करीता रात्रपाळीच्या कामाकरीता माणूस पाहिजे. संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४

● अलिबाग आणि परिसरातील BSC पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी त्वरित संपर्क करा. ९६८९८९२१२१

● अलिबाग-मांडवा-रेवस मार्गावरील लोणारे (मानी फाटा) येथील एस.के. हॉलिडे होम कॉटेज भाडेतत्वावर चालविण्यास देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९०४९१४७५६८

● पोयनाड येथील ब्लॉक विकणेबाबत : पोयनाड येथील नवीन बिल्डींग हरि ॐ सोसायटी 1st फ्लोअर ब्लॉक, रोडटच ६३० एरिया रेडी पोझीशन विकणे आहे. संपर्क : ९४२२५३४३२०

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## शितळामातेच्या दर्शनाला असंख्य भाविकांची भेट

# भक्तांना कौल देणारे जागृत देवस्थान

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

**अलिबाग तालुक्यातील चौल येथील आंबेपुरी पाखडीत नारळ पोफळीच्या छायेत शितळादेवीचे भव्य मंदिर आहे. अलिबाग पासून १८ कि.मी.अंतरावर असलेल्या चौलनाका येथून आग्रावकडे जाणाऱ्या रस्त्यामध्ये शितळामाता मंदिर आहे. पुर्वीची स्थिती लक्षात घेता हे मंदिर चौलच्या दक्षिण खाडीजवळ बांधले होते. परंतु, आता जवळपास खाडी भरून बरीच जमीन वाढली आहे. या देवतेवर आंग्रे घराण्याची दृढ श्रध्दा होती. आंग्रे काळातच १७५९ मध्ये या मंदिराचा जिर्णोध्दार झाल्याचे लिखीत मिळते.**

ही देवता महाराष्ट्रात नव्हे तर अन्य प्रांतातील अनेक कुटूंबाची कुलदैवत आहे. रविवार, मंगळवार, गुरूवार व शुक्रवार या दिवशी भाविकांची मोठी गर्दी पहावयास मिळते. तर, मंगळवार व शुक्रवार या दिवशी भाविक मनातील इच्छा अथवा अडचणी या विषयी देवीचा कौल मागतात. या मंदिराच्या बाहेर उजव्या हाताव्या हाताला गुलमादेवी, खोकलादेवी व




खरूजादेवीच्या मुर्ती आहेत. जर कोणाला गुलमा झाला असेल तर तो जाण्यासाठी गुलमादेवीला ओटी भरणे, कोणाला खोकला झाला असेल तो जाण्यासाठी तर खोकलादेवीची ओटी भरणे, तर कोणाला खरूज झाली असेल तर ती जाण्यासाठी खरूज देवीची ओटी भरून शितळामातेचा आशिर्वाद मोठ्या श्रध्दा व भक्तीने भाविक घेत असतात. तसेच, शितळामातेच्या मंदिराच्या समोरील पुष्करणीतील पाण्याने पाय धुवूनच मंदिरात प्रवेश घेण्याची प्रथा आहे. विविध रोग आदीची सुटका होण्यासाठी देखील या पुष्करणीतील पवित्र पाण्याने आंघोळ करण्याची श्रध्दा भाविक अद्यापी ठेवून आहेत. या देवीच्य परिसरात असलेल्या गोळबादेवी व भरडादेवी या शितळामातेच्या उपदेतता असल्याचे सांगितले जाते.

या मंदिर परिसरात देवीची ओटी भरण्यासाठी साहित्य विक्री करण्यासाठी विक्रेते आहेत. तेथे नारळीपाक, चिक्की, तसेच बकुळीचे गजरे विक्रीस ठेवले जाते, यांची खरेदी करण्याची महिलांची गर्दी असते. चौलनाका ते शितळादेवी मदिरापर्यंत अनेक घरगुती कॉटेज असून तेथे रहाण्याची व जेवण्याची सोय असते. भक्तांना कौल देणारे चौलचे शितळामातेचे जागृत देवस्थानास मुंबई, पुणे, ठाणा तसेच रायगड जिल्हातून असंख्य भाविक नित्याने भेट देत असतात.

## ग्रुप ग्रामपंचायत जासई
**मु.पो.जासई, ता.उरण, जि.रायगड**
### जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत जासई हद्दीतील विकास कामे खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधितून करण्याकरीता विहीत मुदतीमध्ये ठेकेदारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉर्मची किमंत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी ७ नळ पाणी पुरवठा सुविधा करणे | १५ वा वित्त आयोग सन २४/२५ बंधित | २,०३,२८१/- | २,०३२/- | ५००/- | ६ महिने |
| २ | बंजारवाडी माऊली नगर येथे घरोघरी नळ कनेक्शन देणे | १५ वा वित्त आयोग सन २४/२५ बंधित | २,५०,०००/- | २,५००/- | ५००/- | ६ महिने |
| ३ | जासई येथिल जनार्दन म्हात्रे यांचे घरापासून ते जुनी स्मशानभुमी पर्यंत आर.सी.सी.गटार बांधणे. | ग्रामनिधी सन २०२४/२०२५ | ४,८२,७२५/- | ४,८२७/- | ५००/- | ६ महिने |
| ४ | जासई येथील बंजारवाडी माऊलीनगर येथील अंतर्गत रस्ते सिमेंट कॉक्रेट करणे व हायवे पर्यंत रस्ता तयार करणे | ग्रामनिधी सन २०२४/२०२५ | १,९१,८३५/- | १,९१८/- | ५००/- | ६ महिने |
| ५ | रांजणपाडा येथिल योगेश कडू यांच्या घरापासून ते अभिषेक म्हात्रे यांच्या घरापर्यंत रस्ता कॉक्रेटीकरण करणे | ग्रामनिधी सन २०२४/२०२५ | १,२२,८८५/- | १,२२८/- | ५००/- | ६ महिने |
| ६ | रांजणपाडा येथील काना देवजी पाटील यांच्या घरापासून के सचिन अनंत मोकल यांच्या घराजवळील गटारापर्यंत आर.सी.सी गटार बांधणे | ग्रामनिधी सन २०२४/२०२५ | १,८१,७२७/- | १,८१७/- | ५००/- | ६ महिने |
| ७ | रांजणपाडा येथिल स्मशानभुमी रस्ता कॉक्रेटीकरण करणे | ग्रामनिधी सन २०२४/२०२५ | ३,३२,८६६/- | ३,३२८/- | ५००/- | ६ महिने |
| ८ | जासई येथिल दत्ता महादेव पाटील यांच्या घरापासून ते रमेश ठाकूर यांचे घरापर्यंत आर.सी.सी.नाला तयार करणे | ग्रामनिधी सन २०२४/ २०२५ | ४,१३,२२८/- | ४,१३२/- | ५००/- | ६ महिने |
| ९ | जासई येथिल रूपेश बबन घरत यांचे घरापासून ते सुभाष अनंत घरत यांचे घरापर्यंत आर. सी. सी. नाला काढणे | ग्रामनिधी सन २०२४/ २०२५ | ४,९१,८१८/- | ४,९१८/- | ५००/- | ६ महिने |
| १० | जासई येथिल विजय रमन घरत यांचे घरापासून ते धूतूमकर चाळीपर्यंत बंधिस्त नाला बांधणे | ग्रामनिधी सन २०२४/२०२५ | ३,७९,७९७/- | ३,७९७/- | ५००/- | ६ महिने |
| ११ | जासई एकटघर येथील सुंदर नाईक यांच्या घरापासून ते मेन गटारपर्यंत आर.सी.सी. बंधिस्त गटार बांधणे | ग्रामनिधी सन २०२४/२०२५ | ३,६०,८३४/- | ३,६०८/- | ५००/- | ६ महिने |
| १२ | जासई अंतर्गत सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करणे | १५ वा वित्त आयोग सन २४/२५ बंधित | १,५०,०००/- | १,५००/- | ५००/- | ६ महिने |
| १३ | ग्रामपंचायत कार्यालय सभागृह सिलींग, सुशोभिकरण व छप्पर दुरूस्ती करणे | ग्रामनिधी सन २०२४/२०२५ | ४,००,०००/- | ४,०००/- | ५००/- | ६ महिने |

१. निविदा मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक ०४/१०/२०२४ ते १०/१०/२०२४ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक ठेकेदार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ११/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. १५ वा वित्त आयोग चे पेमेंट झालेल्या मुल्यांकनाप्रमाणे रक्कम PFMS द्वारे अदा केली जाईल व त्या करीता लागणारी सर्व कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल.
७. सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाण:- जासई
दिनांक:- ०४/१०/२०२४

**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्राम पंचायत जासई**

**सरपंच**
**ग्रुप ग्राम पंचायत जासई**

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टांमध्ये वर्णन केलेली मिळकत हि तीचे विद्यमान मालक बॉस्को अँनक्लेट टेलीस व बोनापारटे डिसोजा टेलीस यांच्या मालकीची व ताबे वहिवाटीची आहे. सदर मिळकत विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना खरेदी देण्याचे मान्य केले आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदर मिळकत खरेदीचा व्यवहार निश्चित केला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही स्वरुपाचा हक्क, दावा, कुळ, खरेदी, गहाण दान, बक्षीस लीज, वारसा हक्क, अथवा सदर मिळकतीसंबंधी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देणे-घेणे अथवा या व्यवहाराबाबत कोणतीही तक्रार, आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत, मूळ कागदपत्रासह खालील पत्त्यावर येऊन आमची समक्ष खात्री करून द्यावी. वरील मुदतीत तसे न केल्यास सदर मिळकतीवरील कोणाचेही कसलेही हक्क हितसंबंध अथवा आर्थिक बोजा नाही व असल्यास त्यांनी तो समजून उमजून जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे गृहित धरले जाईल व सदर खरेदीचा व्यवहार आमचे अशील पूर्ण करतील आणि त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

मिळकतीचे परिशिष्ट : तुकडी जिल्हा रायगड पोट तुकडी तालुका कर्जत मे. दुय्यम निबंधक साहेब कर्जत यांचे हद्दीतील गाव मौजे वाकस येथील सर्व्हे नं ६६/६बी यांसी क्षेत्र ०० हेक्टर २९ आर यांसी आकार रुपये ५३ पैसे हि मिळकत.

दिनांक - २७/०८/२०२४

**श्री. समीर एच.मेथा**
**सौ. साक्षी एस.मेथा**
ॲडव्होकेट,
१७. आदित्य रेसिडेन्सि (हाऊस ऑफ जगनाप)
मित्रमंडळ चौक, पर्वती, पुणे ४११००९.
मो. ९८५०५६८०४४, ९८९०२१२४१२.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e- Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-50/ 24-25 RFX 7000033194 | Supply of crimping machine and Hydraulic conductor cutter to 400kV R.S. Kharghar. | Rs. 9.76 Lakhs |
| Tend-51/ 24-25 RFX 7000033838 | Providing and fixing of Non - conductive Turbo wind driven conical Bird Guard of various EHV lines under EHV line S/Dn. Mahad under Mahad Division. | Rs. 49.69 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 01.10.2024 to 09.10.2024 up to 11:00 hrs**, **Opening date:-09.10.2024 @ 11:30 Hrs. Tender Fee- Rs. 500/-+ GST** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

### कर्जत नगरपरिषद, कर्जत जि. रायगड.
### ई-निवीदासूचना (संगणक विभाग)

जावक क्रमांक/कनप/संगणक विभाग/१७१४/२०२४-२५, दि. ०३/१०/२०२४

कर्जत नगरपरिषदेच्या वतीने कर्जत नगरपालिका हद्दीतील खालिल प्रमाणे विकास कामे करुन घेण्याची आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | कर्जत नगरपरिषद कार्यालयाकरिता नगरी सुविधा केंद्र चालविणे व विविध विभागास सहाय्यक पुरविणे. |

सदर कामाची ई-निविदा, अटी व शर्ती आवश्यक असणारी कागदपत्रे, शुध्दीपत्रक व इतर तपशिलासह सविस्तर माहिती : http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. ०३/१०/२०२४ सकाळी ११.०० वा पासून उपलब्ध होईल. त्याकामी इच्छुक ठेकेदाराकडुन निविदा मागविणेंत येत आहेत.

सही/-
**(श्री.वैभव गारवे)**
**मुख्याधिका**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**

दि. ०३/१०/२०२४

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे हालिवली, ता. कर्जत जि. रायगड येथील

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ (चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|---|
| ६ | ६/अ | १ | २७७-७७ | २७-७८ |

ची बिनशेती जमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त बिनशेती जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्तखत, खरेदीखत वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त बिनशेती जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त बिनशेती जमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.
**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.''मातोश्री'' निवास आवळस, ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

### मिळकतीचा जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव मंगळवार दिनांक ०५/११/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु. ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून दिनांक ०४/११/२०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार** १. श्री. विशाल दत्तात्रेय मोकल पत्ता:- मु.उचेडे पो. कांदलेपाडा ता. पेण, जि.रायगड **जामिनदार-** २. श्री. हरशल उल्हास भगत पत्ता:-मु.पो.मोठे शहापूर, ता.अलिबाग, जि. रायगड ३. श्री. मोहन नारायण गावंड पत्ता:-मु.मुच्छेडे पो. कांदलेपाडा ता. पेण, जि. रायगड | अर्ज क्र.६२/२२/५२४ जा.क्र. सनिपे/वशी-१/१०१ सन २०२३ दिनांक १५/०३/२०२३ | रु.९,००,०००/- | मौजे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील उचेडे येथील मालमत्ता (घर) क्र.६३० क्षेत्र १५०० फुट ता. पेण, जि. रायगड |

**स्थावर मालमत्ता जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती**
**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास लिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेंत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : ०४/१०/२०२४

**श्री.अजित नामदेव भगत**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

### मिळकतीचा जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय,
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव मंगळवार दिनांक ०५.११.२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र ) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळुन दिनांक ०४.११.२०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार** १. श्री. महेश अनंत पाटील पत्ता:- मु.पो.शहापूर ता. अलिबाग जि. रायगड जामिनदार - २. श्री. सतिश शंकर भगत पत्ता :- मु.पेझारी पो.पोयनाड ता. अलिबाग जि.रायगड ३. श्री. समाधान संदीप म्हात्रे पत्ता :- मु.पो. शहापूर ता. अलिबाग जि. रायगड जि. रायगड | अर्ज क्र.कलम १०१/२०१७-१८ /३२३/ दिनांक १२/०७/२०१७ | रू.९,५०,९५० /- | मौजे ग्रामपंचायत शहापूर ता.अलिबाग जि.रायगड हद्दीतील घर मिळकत क्रमांक ११ क्षेत्र १००१ स्केअर फुट |

**स्थावर मालमत्ता जाहिर लिलावाच्या अटी व शर्ती**
**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४)शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५)सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६)ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास लिलाव केला जाईल.
७)ज्याचे नावे लिलाव पुरा करणेंत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८)विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९)बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०)खरेदीदाराने कसूर केल्यास लिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११)पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२)ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेंत येईल.
१३)थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४)स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५)खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६)सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७)महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८)जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

**श्री. लंकेश भगवान नागांवकर**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग**

अलिबाग
दिनांक : ०४.१०.२०२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, माझे आशिल श्री दत्तात्रय मुरलीधर बदी रा.४/१० ठाकुर नगर, ठाकूर चाळ, माजेवाडी, जोगेश्वरी पूर्व, मुंबई ४०००६० यांनी खालील वर्णनाच्या जमीन मिळकतीचे जमीन मालक श्री. सुनिल सुदाम घनदाट व कल्पना सुनिल घनदाट दोघेही रा. सुमेरू टावर, लोक धारा तीसगाव,कल्याण पुर्व ४२१३०६. यांच्याकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खांडस, ता. कर्जत, जि. रायगड**

| स.नं./हि.नं. | क्षेत्रफळ हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ७१/९ | ०-८२-०० | ०-७५ |
| ७१/१०अ/२ | ०-८०-०० | ०-६६ |

सबब सदर मिळकतीवर अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, कुळअखत्यारपत्र, बयानापावती, हक्क हितसंबंध असल्यास संबंधितांनी आपआपल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार यांचेकडे अगर खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यांसहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात अथवा प्रत्यक्ष भेट घ्यावी. याप्रमाणे कोणाचीही वरील मुदतीत तक्रार आली नाही. तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून सर्व संबंधितांनी आपापल्या तथाकथीत हरकती व तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजून पुढील खरेदीचा व्यवहार आमचे आशील पुर्ण करतील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

दि. ०२/१०/२०२४

सही/-
**(ॲड. विलास दौलत ऐनकर)**
मु.पो. खांडस, ता. कर्जत, जि. रायगड
मोबाईल नं. ९८८१२९८३३८/९५७९८८०१९८

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.तुळशीदास शंकर पाटील, श्री.नितिन शंकर मोकल व श्री.देवीदास सिताराम पाटील, सर्व रा.मु.बागदांडा, पो.सारळ, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी दिनांक १४/०९/२०११ रोजी गट नं.३६ पै, ३७ पै, ३८ पै, ३९ पै, मौजे बागदांडा (पूर्वीचे मिळकतखार) ता.अलिबाग जि.रायगड वर्णन असलेल्या मिळकती बाबतची व्यवस्था व नियोजन करणे शक्य असल्यामुळे सदर मिळकतीबाबतचे अधिकार अखत्यारपत्रान्वये श्री.रणजित रामचंद्र पाटील, मु.शेखाचेगांव, पो.नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड व श्री.सुधीर भिमराव वाकुरे, रा.नवी मुंबई यांच्या बाजूने देण्यात आले होते.

मात्र चालू वर्षापासून आम्हांस सदर मिळकतीबाबतची व्यवस्था व नियोजन करणे शक्य असणार आहे. सबब आम्ही वर उल्लेख केलेल्या इसमांस लिहून दिलेले अखत्यारपत्र रद्द करण्यात येत आहे, असे जाहीर करीत आहोत.

अलिबाग
दिनांक : ०१/१०/२०२४

सही/-
**ॲड.हर्षल पाटील**
रा.मु.नारंगीचाटेप, पो.हाशिवरे,
ता.अलिबाग जि.रायगड
जिल्हा न्यायालय-अलिबाग
मो नं. ९६३७००४२८८

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

**१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग**
**दागिने-नविन डिझाइन्स**



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

**निवडक**

### रोहितने विराटला मागे टाकले

**नवी दिल्ली :** भारताने बांगलादेश संघाला दोनही कसोटी सामन्यात पराभवाची धूळ चाखयला लावून मालिकेत २-० असा दणदणीत विजय मिळवला आहे. या विजयासह भारताच्या रोहित शर्मांने विश्व कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत विराट कोहलीच्या पराक्रमाला मागे टाकले. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाच्या विजयाची टक्केवारी आता सर्वाधिक म्हणजेच ६६.६६ इतकी झाली आहे. कर्णधार म्हणून विराटची विजयाची टक्केवारी ६३.६३ होती. हा पराक्रम रोहितने मोडून काढला आहे.

### विरुष्काचे अनोखे क्रिकेट!

**नवी दिल्ली :** अनुष्का शर्मा पती विराट कोहलीसोबत क्रिकेट खेळताना दिसली. तिने विराटला आव्हान दिले की, ती क्रिकेटमध्ये त्याला हरवू शकते. एवढेच नाही तर भन्नाट नियमांची लांबलचक यादीही तिने वाचून दाखवली. या अनोख्या डावात अनुष्काने अशी गोलंदाजी केली विराट देखील पाहतच बसला. अनुष्काने कोहलीसोबत खेळण्यापूर्वी काही अटी सांगितल्या. तसेच अनुष्का शर्मा नवनवीन नियम आणत असल्याने विराट कोहलीला राग येतो आणि तो खेळमध्येच सोडून निघून जातो.

### मोहम्मद शमी रूग्णालयात

**नवी दिल्ली :** भारतीय संघाला नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिका खेळायची आहे. त्याआधी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. मिळालेल्या वृत्तानुसार शमी कसोटी मालिकेला मुकण्याची शक्यता आहे. शमीच्या गुडघ्याला सूज आली. त्यामुळे तो पुढील ६-८ आठवडे मैदानाबाहेर राहू शकतो. नोव्हेंबर २०२३च्या विश्वचषक फायनलनंतर शमीने एकही सामना खेळलेला नाही. डिसेंबर २०२३ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांत तो खेळू शकला नाही.

### सेहवाग काँग्रेसच्या मंचावर

**हरियाणा :** भारतीय क्रिकेट संघाचा माजी खेळाडू वीरेंद्र सेहवाग मागील काही दिवसांपासून काँग्रेस उमेदवारांचा प्रचार करताना दिसला आहे. त्यामुळे तो राजकीय खेळी सुरू करणार असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. आता सेहवाग हरियाणा विधानसभेच्या रिंगणात असलेले काँग्रेस उमेदवार अनिरुद्ध चौधरी यांच्यासाठी मते मागताना पाहायला मिळाला. ते तोशाम या मतदारसंघातून नशीब आजमावत आहेत. ४८ वर्षीय अनिरुद्ध चौधरी यांना निवडणुकीत त्यांच्याच कुटुंबातील सदस्याचे आव्हान आहे.

### मोदींशी बोलले नाही

**हरियाणा :** विधानसभा निवडणुकीदरम्यान, जुलाना येथील काँग्रेस उमेदवार आणि माजी कुस्तीपटू विनेश फोगाट यांनी दावा केला आहे की, तिचे वजन १०० ग्रॅमने वाढल्यामुळे पॅरिस ऑलिम्पिकसाठी अपात्र ठरल्यानंतर तिला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा फोन आला होता, परंतु त्यात काही अटी ठेवण्यात आल्या होत्या. त्यांना हा व्हिडिओ सोशल मीडियावर टाकायचा होता. त्यामुळे मी बोलण्यास नकार दिला. एका खासगी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत विनेशने याचा खुलासा केला आहे.

# मुंबईचा पाचशे धावांचा डोंगर

## सर्फराझ खानचे नाबाद द्विशतक, पण रहाणेचे शतक थोडक्यात हुकले

**। लखनौ । वृत्तसंस्था ।**

बांगलादेशविरुद्धच्या कसोटी मालिकेत खेळण्याची संधी न मिळालेल्या सर्फराझ खानने ही कसर इराणी करंडक सामन्यात शेष भारत संघाविरुद्धच्या लढतीत पूरेपूर भरून काढली. त्याने शानदार नाबाद द्विशतक केले. त्यामुळे मुंबईने दोन दिवसांच्या खेळात ९ बाद ५३६ धावांचा डोंगर उभा केला.



अटल बिहारी वाजपेयी स्टेडियमवर सुरु असलेल्या या सामन्यात पहिल्या दिवशी केवळ ६८ षटकांचा खेळ झाला तर मुंबईच्या डावातील १३८ षटके पूर्ण झाली. या दोन दिवसांत मुंबईकरांनी फलंदाजी केली आणि शेष भारत संघाच्या खेळाडूंच्या क्षमतेचा कस पाहिला. या स्टेडियमपासून काही अंतरावर असलेल्या कानपूरमध्ये भारत-बांगलादेश दुसऱ्या कसोटीत सर्फराझ खान राखीव खेळाडू होता. चौथ्या दिवसापर्यंत तो संघासोबत होता, पण या इराणी सामन्यासाठी तो लखनौमध्ये आला आणि येथे त्याने देशांतर्गत स्पर्धांमधील आपले सातत्य दाखवून दिले. २७६ चेंडूंचा सामना करताना त्याने २५ चौकार आणि चार षटकारांसह नाबाद २२१ धावांची खेळी केली.

सचिन, रहाणे, रोहितलाही जमलं नाही, ते त्यानं मुंबईसाठी करून दाखवलं. एकीकडे सर्फराझ नाबाद द्विशतक करत असताना कर्णधार अजिंक्य रहाणेचे शतक मात्र तीन धावांनी हुकले. काल खेळ सुरु झाला तेव्हा मुंबईची अवस्था ३ बाद ३७ अशी झाली होती आणि हाच धावफलक ९ बाद ५३६ असा भरभक्कम झाला आहे. पहिल्या दिवसाच्या ४० व्या षटकाच्या सुरुवातीस सर्फराझ मैदानावर आला आणि १३८ षटकांच्या खेळापर्यंत तो नाबाद राहिला ९८ षटके तो मैदानावर उपस्थित होता. तीन मोठ्या भागीदारी सर्फराझ खानने प्रथम अजिंक्य रहाणेसह पाचव्या विकेटसाठी १३१, सातव्या विकेटसाठी तनुष कोटियनसह १८३ आणि शार्दुल ठाकूहसह नवव्या विकेटसाठी ७३ धावांची भागीदारी केली. सकाळी खेळ सुरु झाल्यावर सर्फराझ आणि रहाणे शेष भारत संघाच्या गोलंदाजांवर भारी ठरत होते. दोघेही सहजपणे धावा जमवत होते. धावांची सरासरी षटकामागे तीन पेक्षा अधिक धावांची होती. रहाणे अगोदर शतकाच्या जवळ गेला. पण तो ९७ धावांवर बाद झाला.

दुसरा नवा चेंडू उपलब्ध व्हायच्या अगोदर यश दयालने रहाणेवर आखूड टप्प्याचा चेंडू टाकला. प्रथम या चेंडूवर रहाणेचे लक्ष होते. तो सोडून द्यावा की खेळावा या द्विधामनस्थितीत असताना चेंडू हलकेच ग्लोजला लागून यष्टीरक्षकाकडे गेला आणि रहाणे शतकापासून वंचित राहिला. रहाणेपाठोपाठ शम्स मुलानी बाद झाल्यावर शेष भारत संघाच्या गोलंदाजांना हायसे वाटले होते, परंतु त्यानंतर मुंबईच्या डावातील सर्वात मोठी भागीदारी सादर झाली. ६४ धावा करणाऱ्या तनुष कोटियनने सर्फराझसह मुंबईची धावसंख्या साडेचारशेच्या पलिकडे नेली. अखेर प्रसिद्ध कृष्णाने सलग दोन चेंडूंवर तनुष आणि मोहित अवस्थी यांना बाद केले.

मुंबईच्या ८ बाद ४६८ धावा झालेल्या असताना सर्फराझच्या साथीला शार्दुल ठाकूर आला आणि या दोघांनीही शेष भारत संघाच्या गोलंदाजांना घाम गाळायला लावला. दिवसाचा खेळ संपायला तीन चेंडूंचा खेळ शिल्लक असताना शार्दुल बाद झाला.

## जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा सर एस ए ज्युनिअर कॉलेजला उपविजेते पद



**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

पाली सुधागड येथे झालेल्या रायगड जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत १९ वर्ष वयोगटातील सामन्यामध्ये मुरुड जंजिरामधील सर एस. ए. हायस्कूल व स्वर्गीय म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाने उपविजेते पद पटकाविले. या संघातील जिग्नेश गायकर याची विभागीय स्तरावर निवड झाली आहे.

अंतिम सामन्यात झालेल्या अटीतटीच्या लढतीत अलिबाग संघाने मुरुड संघाला केवळ दोन गुणांनी धूळ चारली. त्यामुळे मुरुड संघाला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत एकूण १३ संघांनी आपला सहभाग नोंदविला. या स्पर्धेसाठी शाळेतील पी.टी. शिक्षक बालाजी घुगे, महेंद्र घाटवळ, आनंद तोंडले व दीपक पालशेतकर यांनी विशेष मेहनत घेतली.

शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे तसेच जंजिरा विद्या मंडळाचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर यांनी उपविजेत्या संघाचे विशेष कौतुक केले. निवृत्त क्रीडा शिक्षक व संचालक पी. के. आरेकर यांनी विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली. सर्व संघाचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

### चेन्नईत १९ वर्षांखालील कसोटी

## भारतीय संघाचा ऑस्ट्रेलियावर थरारक विजय

**। चेन्नई । वृत्तसंस्था।**

अतिशय संयमी आणि दडपणाचा समर्थपणे सामना करत निखिल कुमारने केलेल्या नाबाद अर्धशतकाच्या जोरावर भारतीय १९ वर्षांखालील संघाने ऑस्ट्रेलियाच्या युवा संघाचा तीन दिवसांच्या क्रिकेट सामन्यात दोन विकेटने पराभव केला. सातव्या क्रमांकावर फलंदाजीस आलेल्या निखिल कुमारने नाबाद राहत ७१ चेंडूत ५५ धावांची खेळी केली. त्यामुळे भारताला अखेरच्या दिवशी तासाभराचा खेळ शिल्लक असताना विजय मिळवता आला.



भारतीय संघाच्या या विजयात लेग स्पिनर मोहम्मद इनामनेही मोलाची कामगिरी केली. त्याने ७९ धावांत सहा विकेट मिळवल्यामुळे ऑस्ट्रेलियाचा दुसरा डाव २१४ धावांत गुंडाळता आला. ऑस्ट्रेलियाने चार बाद ११० धावांवरून खेळ सुरू केला होता.भारताला विजयासाठी २१२ धावांचे आव्हान मिळाले होते, परंतु खेळपट्टी फलंदाजीस पोषक नसल्यामुळे हे आव्हान सोपे नव्हते. त्यातच भरवशाचा वैभव सूर्यवंशी लवकर बाद झाला. त्यानंतर नित्या पांड्या (५१) आणि केपी कार्तिकेय (३६) यांनी ७१ धावांची भागीदारी केली. परंतु हे दोघेही पाठोपाठ बाद झाले. सात बाद १६७ अशी अवस्था झाल्यावर निखिल कुमारने समर्थ नागराजसह आठव्या विकेटसाठी ४७ धावांची भागीदारी केली.

## महाराष्ट्राला सुवर्णचा दुहेरी मुकुट

### साताराचा प्रसाद, सांगलीची वेदिका सर्वोत्कृष्ट खेळाडू

**। पुष्पुर । वृत्तसंस्था ।**

येथील अलबर्ट एक्का स्टेडियमवर सुरू असलेल्या ३४ व्या किशोर-किशोरी राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेत महाराष्ट्राच्या किशोर व किशोरी संघाने विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादित केला.

किशोर गटाचे सलग ९ वे तर किशोरी गटाचे ७ वे विजेतेपद आहे. साताराचा प्रसाद बळीप सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्काराचा तर सांगलीच्या वेदिका तामखडे ही इला पुरस्काराची मानकरी ठरले. महाराष्ट्र विरुद्ध तेलंगणा हा मुलांचा अंतिम सामना अतिशय अटीतटीचा झाला. मध्यंतराला १ गुणांनी पिछाडीवर असलेल्या महाराष्ट्र संघाने २४-१५ असा सामना जिंकला. महाराष्ट्र विरुद्ध कर्नाटक मुलींच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राने १८ गुणांनी सहज विजय मिळवला. मध्यंतराला १४-४ अशी आघाडी घेत महाराष्ट्रने २६-८ असा सामना जिंकला. महाराष्ट्र संघाकडून वेदिका तामखडे आणि सिद्धी भोसले यांनी आपल्या खेळाचे चांगले प्रदर्शन केले. सांघिक कामगिरीमुळे महाराष्ट्राला सुवर्णचा दुहेरी मुकुट पटकावता आला. त्यामुळे संघातील खेळाडूंमध्ये चैतन्य पसरले आहे.यापुढेही चांगला खेळाची अपेक्षा चागत्यांना आहे.

## पाकिस्तानी खेळाडूंना पगाराची प्रतीक्षा

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तान क्रिकेट संघाला दुसऱ्या शब्दात फेरबदलाचे संघ असेही म्हणता येईल. जेथे नेहमीच काहीतरी विचित्र घडत असते. अलीकडेच बाबर आझमने वनडे आणि टी-२० च्या कर्णधारपदाचा राजीनामा दिला आहे. दरम्यान आता पाकिस्तानी खेळाडूंना गेल्या चार महिन्यांपासून पगार मिळालेला नसल्याचा दावा करण्यात येत आहे.

खेळाडूंना चार महिने झाले पगार मिळत नाही, दुसरीकडे, त्यांना केंद्रीय करार गमावण्याचा धोकाही आहे. फिटनेस चाचणीत अपयशी ठरलेल्या खेळाडूंना केंद्रीय करार मिळणार नाही, असे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहिसन नक्वी यांनी सांगितले.



मीडिया रिपोर्ट्सनुसार, पाकिस्तानी खेळाडूंना अद्याप केंद्रीय करार मिळालेला नाही. करार मिळण्यास उशीर झाल्याबद्दल पाकिस्तानी क्रिकेटपटू अजिबात खूश दिसत नाहीत. क्रिकेट पाकिस्तानच्या वृत्तानुसार, सेंट्रल कॉन्ट्रॅक्टच्या अनिश्चिततेबाबत खेळाडू बोर्डाकडून खूप निराश आहेत. २०२३ मध्ये २०२६ साठी केंद्रीय करार करण्यात आला.

अहवालात पाकिस्तानी खेळाडूंना गेल्या चार महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्याचे सांगण्यात आले. अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, २०२३ च्या एकदिवसीय विश्वचषकातील पाकिस्तानच्या कामगिरीमुळे पीसीबीला पुन्हा एकदा कराराचे पुनरावलोकन करण्यास भाग पाडले आहे. विश्वचषक २०२३ पासून पाकिस्तान संघ खराब फॉर्ममधून जात आहे. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेत संघाने उपांत्य फेरीत स्थान निश्चित केले नाही. २०२४ टी-२० विश्वचषकातही संघाची अवस्था वाईट झाली होती.

## ऋतुराजची फ्लॉप कामगिरी सुरूच

**। लखनौ । वृत्तसंस्था।**

टीम इंडियातून बाहेर असलेला सलामीवीर ऋतुराज गायकवाड इराणी कपमध्ये फ्लॉप ठरला आहे. ऋतुराज गायकवाडची बांग्लादेशविरुद्धच्या टी मालिकेसाठी निवड झाली नाही. अशा स्थितीत इराणी कपमध्ये जास्तीत जास्त धावा करून तो निवडकर्त्यांना चोख प्रत्युत्तर देईल, अशी त्याच्याकडून अपेक्षा होती. मात्र गायकवाड हे करू शकला नाही. पहिल्या डावात तो स्वस्तात बाद झाला.



इराणी चषकाचा सामना मुंबई आणि रेस्ट इंडिया यांच्यात लखनऊमध्ये खेळला जात आहे. ज्यामध्ये मुंबईने प्रथम फलंदाजी करताना ५३७ धावा केल्या. ज्यात सरफराज खानने जबरदस्त द्विशतक झळकावले. सर्फराजने २८६ चेंडूंत २५ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीनेनाबाद २२२ धावांची खेळी केली. कर्णधार अजिंक्य रहाणेनेही ९७ धावांची शानदार खेळी केली. तर गोलंदाजीत रेस्ट इंडियाकडून मुकेश कुमारने चमकदार कामगिरी करत ५ बळी घेतले.

प्रत्युत्तरात फलंदाजीला उतरलेल्या रेस्ट ऑफ इंडियाचा कर्णधार ऋतुराज गायकवाडकडून मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र पहिल्या डावात त्याला कोणतीही असरदार कामगिरी करता आली नाही. गायकवाडने २७ चेंडूंचा सामना केला आणि त्याला केवळ १ चौकारासह ९ धावा करता आल्या.

## मार्टिन गप्टिलने ठोकले वादळी शतक

**। लखनौ । वृत्तसंस्था।**

लिजेंड्स लीग क्रिकेट २०२४ चा १२ वा सामना कोर्नक सूर्या ओडिशा विरुद्ध सदर्न सुपर स्टार्स यांच्यात खेळला गेला. ज्यामध्ये सदर्न सुपर स्टार्सने कोर्नक सूर्याचा ८ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना कोर्नाक सूर्याने निर्धारित २० षटकांत ९ गडी गमावून १९२ धावा केल्या. सदर्न सुपर स्टार्सने हे लक्ष्य १६ षटकांत केवळ २ गडी गमावून पूर्ण केले. सुपर



स्टार्सकडून सलामीवीर मार्टिन गप्टिलने शतक झळकावले. पहिल्या विकेटसाठी केवळ ४.५ षटकांत ७६ धावा जोडल्या. ज्यात रिचर्ड लेव्हीने केवळ २१ चेंडूंत ९ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने ६३ धावांची खेळी केली. तर जेसी रायडरने १८ चेंडूत १८ धावा केल्या. मधल्या फळीत युसूफ पठाणने २२ चेंडूत ३३ धावांची खेळी खेळली पण कर्णधार इरफान पठाणला केवळ १० धावा करता आल्या. सुपर स्टार्सकडून सुबोध भाटीने २ बळी घेतले.

प्रत्युत्तरात लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या सदर्न सुपर स्टार्सची सुरुवात फारशी चांगली झाली नाही. अवघ्या ३४ धावांच्या स्कोअरवर संघाला पहिला धक्का बसला. कर्णधार श्रीवत्स गोस्वामी १५ चेंडूत १८ धावा करून बाद झाला. मात्र, त्यानंतर मार्टिन गप्टिलने एकहाती दमदार शतक झळकावत संघाला विजयाकडे नेले. त्याने केवळ ५४ चेंडूत ११ षटकार आणि ९ चौकारांच्या मदतीने १३१ धावांची नाबाद खेळी खेळली. तसेच पवन नेगी ११ चेंडूत १४ धावा करून नाबाद राहिला. कोर्नाकचा गोलंदाज नवीन स्टीवर्टने अवघ्या २ षटकांत ६३ धावा दिल्या.

### आयसीसी महिला टी २० विश्वचषक

## न्यूझीलंडसोबत भारताचा पहिला सामना

**। दुबई । वृत्तसंस्था ।**

आयसीसी महिला टी-२० विश्वचषक २०२४ गुरुवारपासून (दि. ३) सुरू झाला आहे. यामध्ये भारताचा पहिला सामना न्यूझीलंडशी होणार आहे. टीम इंडिया आणि न्यूझीलंड यांच्यात शुक्रवारी दुबईत सामना रंगणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनवर नजर टाकली तर शफाली वर्मासोबत स्मृती मानधनाला सलामीची संधी मिळू शकते. टीम इंडियाचे बॉलिंग युनिटही खूप मजबूत आहे. यामध्ये रेणुका सिंगसोबत श्रेयंका पाटील किंवा सजना संजीवनला संधी मिळू शकते.



महिला टी-२० विश्वचषकातील पहिला सामना बांग्लादेश आणि स्कॉटलंड यांच्यात होणार आहे. हा सामना शारजाह येथे गुरुवारी होणार आहे. तर भारताचा पहिला सामना न्यूझीलंडशी ४ ऑक्टोबर रोजी होईल. या सामन्यात टीम इंडियाला कडवी टक्कर मिळू शकते. सोफी डिव्हाईनच्या नेतृत्वाखालील न्यूझीलंड संघात सुझी बेट्स, अमेलिया केर आणि ईडन कार्सनसारखे चांगले खेळाडू आहेत. त्यामुळे हा सामना कदाचित भारतासाठी सोपा असणार नाही.

शफाली आणि मानधना यांच्यासोबत यास्तिका भाटियाला टीम इंडियाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये संधी मिळू शकते. यास्तिका तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येऊ शकते. तर कर्णधार हरमनप्रीत चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करू शकते. याशिवाय जेमिमाह रॉड्रिग्ज, रिचा घोष आणि पूजा वस्त्राकर यांनाही प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान मिळण्याची शक्यता आहे. टीम इंडिया प्लेइंग इलेव्हनमध्ये आशा शोभना किंवा श्रेयंकाचा समावेश करू शकते. न्यूझीलंडविरुद्ध रेणुका सिंग महत्त्वाची भूमिका बजावू शकते. सर्व सामने यूएईमध्ये खेळवले जाणार आहेत.

**भारताची संभाव्य प्लेइंग इलेव्हन**

**शफाली वर्मा, स्मृती मानधना, यस्तिका भाटिया, हरमनप्रीत कौर, जेमिमाह रॉड्रिग्स, रिचा घोष, पूजा वस्त्राकर, दीप्ती शर्मा, राधा यादव, सजना सजीवन, आशा शोभना, श्रेयंका पाटील, रेणुका सिंग**

## जयविक्रमावर १ वर्षाची बंदी

**। लखनौ । वृत्तसंस्था।**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने श्रीलंकेचा युवा क्रिकेटपटू प्रविण जयविक्रमावर १ वर्षाची बंदी घातली आहे. श्रीलंकेचा डावखुरा फिरकी गोलंदाज प्रविण जयविक्रमावर आयसीसी भ्रष्टाचार विरोधी संहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. दरम्यान २६ वर्षीय क्रिकेटपटू प्रवीण जयविक्रमाने हे सर्व आरोप स्वीकारले बोलले जाते.

प्रविण जयविक्रमाने २०२१ मध्ये श्रीलंकेसाठी पदार्पण केले होते. त्याने आपल्या कामगिरीने तिन्ही फॉरमॅटमध्ये स्थान मिळवले. मात्र, त्याला



संघातील स्थान कायम राखता आले नाही. जयविक्रमाने जून २०२२ मध्ये आपल्या देशासाठी शेवटचा सामना खेळला होता. यानंतर तो संघाबाहेर राहिला. त्यानंतर जयविक्रमाला आतापर्यंत संघात स्थान मिळवता आले नाही.

जयविक्रमाने श्रीलंकेसाठी ५ कसोटी, ५ एकदिवसीय आणि ५ टी आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. त्याच्यावर आयसीसी भ्रष्टाचार विरोधी संहिता प्रतिबंधक युनिटच्या तपासात विलंब किंवा अडथळा आणल्याचा आरोप आहे. याशिवाय दस्तऐवज नष्ट करणे किंवा इतर माहिती लपवणे हे देखील त्याच्यावरील आरोपांमध्ये समाविष्ट आहे. आयसीसीने भ्रष्टाचार विरोधी संहितेअंतर्गत हा गुन्हा मानला आणि त्याच्यावर १ वर्षाची बंदी घातली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)